# प्रभुतरुण दिवाळी अंक २०१०

## अंतरंग

**संपादकीय**

**विस्तारीत संपादकीय**

### कथा व लेख

सुहासिनी कीर्तिकर, नंदकुमार विजयकर, डॉ. सुमन नवलकर, डॉ. मीनाक्षी देसाई, पं. सुजन राणे, शुभदा आगासकर, बागेश्री परीख, लता त्रिलोकेकर, मोना विजयकर, अलका मीनल तळपदे, प्रताप वेलकर, अजित मानकर, स्वप्नील व्यवहारकर, तन्वी धुरंधर

### कविता

यशोदिनी राणे, मिथिल वेलकर, डॉ. सुमन नवलकर, अजित प्रमोद तळपदे, मिलिंद सुहास प्रधान, दीपकळी नवलकर, अलका तळपदे

### END OF WORLD

अलोक प्रधान, आनंद विजयकर, अपर्णा समीर सेंजित-विजयकर, मयुरा नायक, निलेश विठोबा नायक, रौनक समीर विजयकर, चारुदत्त धैर्यवान, शौनक कौशिक जयकर

### FICTITIOUS PRODUCTS

सुष्मिता कोठारे, कश्मिरा अजिंक्य, प्रेरित सुधीर नायक, प्रेरणा मानकर, तन्वी धुरंधर, उत्कर्ष अजिक्य

### SAAS- BAHU

मयुरा नायक, साधना-संजीवनी नवलकर, पवित्रा आणि प्रांजल कीर्तिकर, अनिला-ऐश्वर्या धैर्यवान

### SPORTS

करण, निषाद धुरंधर, प्रदीप विजयकर, सुष्मिता कोठारे, स्वप्नील व्यवहारकर

### KIDS SECTION

कश्मिरा अजिंक्य, सान्वी चारुदत्त धैर्यवान, लीना कीर्तिकर, नील राणे, जय कोठारे, अदिती सचिन विजयकर, इशान कोठारे, सानिया नवलकर, तनिशा नितिन देसाई. यश तळपदे, अदिती देसाई, अनिष नील कीर्तिकर, वेदांत धैर्यवान, श्रिया कौशिक जयकर,

**भाऊबीज, बातम्या, प्रभुतरुणाची डायरी, देणग्या**

## व्यंगचित्रे- प्रदीप कोठारे

तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?

# प्रभुतरुण

दिवाळी अंक

मूल्य रुपये दहा

( स्थापना : तारीख २५ ऑगस्ट १९२३ )

संपादिका : **सुहासिनी कीर्तिकर**

**www.prabhutarun.com**

कार्यकारी संपादक मंडळ :
**मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**

**वर्ष ८६ वे)** **नोव्हेंबर - डिसेंबर २०१०** **(अंक ९७६**

***संपादकीय***

# शुभेच्छा

**-सुहासिनी कीर्तिकर**

'प्रभुतरुण' आपल्या स्वागतासाठी नेहमीच सज्ज असतो. मन:पूर्वक स्वागत. यावर्षी १६ नोव्हेंबरला हा अंक प्रसिद्ध होताना आपली दिवाळी होऊन गेली आहे. परंतु परभू जनमानस नित्यच दिवाळीचा आनंद साजरा करीत असते. शिवाय अजून देवदिवाळी साजरी होणे आहेच की. रसिक वाचक, हितचिंतक, जाहिरातदार, लेखक. चित्रकार हे प्रभुतरुणासाठी देवापेक्षा किंचितही कमी नाहीत. तेव्हा त्यांच्यासाठी असलेला हा दिवाळीअंक त्यांना अर्पण. अर्थात् त्यांच्याच देवतुल्य अशा सहकार्याने!

दरवर्षीप्रमाणे या दिवाळी अंकासाठी आमचे कार्यकारी संपादक मंडळ वेळात वेळ काढून सज्ज झाले. 'युवा मंच' ची फळी त्यात सामील झाली... आणि हा बहारदार अंक सृजनाचे सुंदर, कलात्मक रूप घेऊन आला. बालकांपासून ते दुसरे बालपण भोगणाऱ्या सुजाण ज्येष्ठांपर्यत सर्वांचे हात या सृजनसुंदरतेला लागले आहेत. वाचकहो, या 'सुंदरतेच्या सुमनावरचे दव' तुम्ही तितक्याच रसिकतेने चुंबून घ्यालच. खात्री आहे मला.

या वर्षीच्या दिवाळी अंकात एक उणीव मात्र प्रकर्षाने जाणवेल. न चुकता आपला अनुभवसिद्ध लेख देणारे श्री. मुकुंद अजिंक्य यांची अनुपस्थिती! 'फांदीवरची घरटी विस्कटली, झाड स्तब्ध उभे' अशी प्रभुतरुणाची अवस्था काही काळ झाली त्यामुळे. पण झाड काही काळाने हलते, डोलते, फुलते, फळते. 'प्रभुतरुण' ही सुहास कोठारे, विहंग नायक यांच्या पुण्याईने पुढेही असाच फुलत फळत राहिलाय्. या पुण्याईत आता मुकुंद अजिंक्यांच्या आठवणींची भर पडलीय्. आमचा नव्हे; आपला 'युवामंच;' या पुण्याईच्या बळावर आणखी भरारेल. या भरारत्या, उभरत्या कर्तृत्वाचे दृश्य आणि वाचनीय रूप म्हणजेच हा दिवाळी अंक. तुमच्या सोबतीला आलाय.

या दिवाळी अंकासोबत रसिकहो, तुम्हा सर्वांना नवीन वर्ष सुख, समाधान, शांती, ध्येयपूर्ती यांनी समृद्ध असलेले जावो ही आमची मनापासून सदीच्छा आहेच.

# विस्तारीत संपादकीय

आज मराठीत लिहून एक प्रयोग करणार आहोत. नाहीतरी 'प्रभुतरुण ' हा एक 'युवामंच'मुळे चांगला प्रयोगच आहे नं?

'प्रभुतरुण' जरी दिवाळीनंतर निघाला तरी काय हरकत आहे? सगळे दिवाळी अंक दिवाळीनंतर दोन दोन महिने वाचत असता. म्हणजे दिवाळीची सगळी गडबड संपल्यावर, ओबामा येऊन गेल्यावर आरामात तुम्ही 'प्रभुतरुण' वाचा. खरंच वाचा. वाचनीय आहे. अनेक लेखकांनी आपणहून 'प्रभुतरुणा'ला सहकार्य केलं आहे. कुणाकडून फार साहित्य मागवावं लागलं नाही. बघा, आपला प्रभुतरुण सगळ्यांनाच कसा आपला वाटतोय!

'युवामंच'च्या आमच्या सवंगड्यांनी या अंकाची आखणी करण्यासाठी खूप खूप मेहनत घेतलीय. मुखपृष्ठही 'युवामंच'च्या सौ. विदुला श्रीनल कोठारेचं आहे. आवडेल तुम्हाला.


सध्या महागाई आहे. बेकारी आहे. आर्थिक घोटाळे आहेत. शिक्षणाचे 'वाजले की बारा' अशी परिस्थिती आहे. लहान मुलं 'ओझ्याचा बैल' झाली आहेत. सत्तर लाख माणसं रोज ट्रेनने धावपळ करताहेत. आहे खरं तसं. पण 'प्रभुतरुण'वर प्रेम करणारा प्रत्येक पाठारे प्रभु माणूस या पलीकडे जाऊन आनंदी आहे. कारण आनंद हाच त्याचा मंत्र आहे. या आनंदात भर घालण्यासाठी 'प्रभुतरुण' आला आहे.

त्याच्यावर झडप घाला. वाचा. पहा. आनंद मिळवा. आनंद लुटा.

आनंदाच्या 'लुटारूं'ना 'हॅपी दिवाळी आणि हॅपी न्यू इयर'!

**-कार्यकारी संपादक**

---




## सर्व प्रभु जनांस अंक समर्पित



## नूतन वर्ष सुखाचे जावो!

# ‘अजिंक्य’ आठवणी

## ❖ सुहासिनी कीर्तिकर ❖



जन्म- १०-०१-१९३० निधन-१५-१०-२०१०

प्रभुतरुणाचा दिवाळी अंक उघडला की पहिल्या लेखाचा मान असायचा तो मुकंद अजिंक्य यांचा. हे मानाचे पहिलेपण केवळ ज्येष्ठतेवर नसायचे. अर्थात् ते सर्वार्थाने ज्येष्ठ होतेच. इन्कमटॅक्स कमिशनर म्हणून निवृत्त झालेले मुकुंदराव ‘ट्रिब्युनलच्या केसेस’ सोडवायला सल्लागार होते! अर्थखात्यातही ते आपल्या अनुभवाचा फायदा देऊन सल्लागाराचे क्वचित् सेवादान करीत. त्यांची शाळेपासून उच्च शिक्षणापर्यंतची कारकीर्द उज्ज्वल अशी होती. नोकरीनिमित्ताने बदल्यांच्या गावी नांदून त्यांनी अनेक अनुभव गाठीशी बांधून सचोटीने स्वत:ला वलयांकित केले होते. पण महत्त्वाचे म्हणजे आपले व्यक्तिमत्त्व घडवताना त्यांचे वाचन, लेखन, चित्रछंदसंगोपन, निरीक्षण आणि त्यांची रसिकता त्यांनी सजग ठेवली होती. संगीताच्या मैफली ऐकणे हा त्यांचा विरंगुळा होता. आत्मचिंतन करणे ही त्यांची विशेषता होती. पांडुरंग कृपेवर त्यांचा अढळ विश्वास होता. दरवर्षी आषाढीला ते पंढरपूरच्या विठोबाची सश्रद्ध मनाने पादपूजा करीत. विठ्ठलाचा आशीर्वाद त्यांना आयुष्यभर पुरला. त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे व्यवसायानिमित्त मोठमोठ्या थोर व्यक्तींच्या सहवासात येऊनही त्यांना इतर सामाजिक, सांस्कृतिक उपक्रमांपेक्षाही ज्ञातीकार्यात रस होता. चॅरिटीजच्या भूतकाळातील काही संस्थांच्या विलीनीकरणाच्या उपक्रमात मुकुंद अजिंक्य यांचा मोठा सहभाग होता. ‘प्रभुतरुणा’चे तर ते सर्वार्थाने हितचिंतक होते. नुसते हितचिंतक नव्हे; मित्र-आप्त सर्वकाही होते. ‘प्रभुतरुणा’ची वाटचाल कशी होते आहे; याकडे त्यांचे बारीक लक्ष असायचे. कोणालाही लक्ष्य न करता ‘प्रभुतरुण’ कसा मोठा होतो आहे; याबद्दल निर्मळ आनंद त्यांच्या मनात दाटून असायचा. सुहास कोठारे, विहंग नायक यांच्याशी वेळोवेळी संवाद साधून ते हा आनंद व्यक्त करायचे. माझा किंवा आणखी इतर कुणाचाही लेख आवडला तर मुद्दाम वेळात वेळ काढून फोन करायचे. ह्या फोनवर भेटायचा तो रसिक मनाचा जाणकार. क्वचित टीकाकारही. मुकुंद अजिंक्य नावाची भक्कम पाठींबा देणारी जणू एक संरक्षक जाणीवच पाठीशी सतत असायची अशावेळी. त्यांच्या प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांना घरात राहायला भाग पाडणारी अलीकडची काही वर्षे सोडली तर प्रभुतरुणाच्या वाढदिवशी त्यांची आश्वासक उपस्थिती असायचीच. अध्यक्ष किंवा महनीय प्रवक्ते तेच असायचे. पाठारे प्रभू म्हणून स्वत:चं वाढणं ते ‘प्रभुतरुणा’च्या वाढण्यात गुंफून बसले होते. ही गुंफण मनोज्ञ होती.

याच गुंफणीमुळे प्रभुतरुणाशी त्यांची घट्ट वीण जुळलेली होती. एक लेखक, कलावंत म्हणून त्यांनी

'प्रभुतरुणा'त दोन लेखमाला लिहिल्या. त्या दोन्ही लेखमाला वाचकांनी भरभरून उचलून धरल्या. स्वत:च्या आयुष्यातील वेचलेले स्मरणीय प्रसंग, घरातील, शाळा कॉलेजातील संस्कारक्षम ताकद असलेल्या व्यक्ती, शेजारी म्हणून लाभलेले पु. ल. देशपांडे, सोपानदेव चौधरी, संतनिवासासह त्यांनी वहिवटलेली विविध ठिकाणची विविध प्रकारचे घरपण असलेली घरं, स्वत:ला लाभलेले यश आणि काही प्रसंगी त्यांना डावलल्यामुळे त्यांची झालेली अवहेलना, स्वत:चे प्रवास, वारकरी म्हणून आलेले अनुभव, झालेले साक्षात्कार इत्यादींचा साक्षात्कार या लेखमालांमधून वाचकांना घडायचा. त्यांच्या लेखनात विषयांचे घरगुतीपण असायचेच, पण त्याच जोडीने घरंदाजपणही असायचे. लौकिक, चारित्र्यसंपन्नता यांच्या दर्शनाने त्यांचे लेखन संपन्न असायचे. लेखमालांव्यतिरिक्त त्यांच्या कविता, चित्रे यांनाही प्रभुतरुणाच्या वाचकांनी दाद दिली. म्हणूनच त्यांच्या लेखनाच्या ज्येष्ठतेनेच प्रभुतरुणाच्या दिवाळी अंकातही त्यांच्या लेखाची पणती पहिल्या क्रमांकावर असायची अन् दिवाळी अंक त्यामुळं उजळून जायचा. याही वर्षी ते मला लेख देण्याचं कबूल करून बसले होते; प्रकृती साथ देत नसतानाही. एलफिन्स्टन कॉलेजामध्ये त्याकाळी इंग्रजीचे अध्यापन करणारे मंगेश विठ्ठल राजाध्यक्ष यांचे मुकुंदराव आवडते विद्यार्थी. 'मं. वि.' गेले तेव्हा मुकुंदरावांचा मला फोन आला. मी डॉ. विजया राजाध्यक्षांना नुकतीच भेटून आले होते. आमचं (म्हणजे माझं अन् मुकुंदरावांचं) 'मं. वि'बद्दल आठवणींना उजाळा देत मुक्त बोलणं झालं. मुकुंदराव राजाध्यक्षांच्या तरुण कारकिर्दीचे साक्षीदार. तेव्हा राजाध्यक्षांचं लग्न नव्हतं झालेलं. बोरीवलीला राहत ते. या बोरीवलीच्या घरी मुकुंदराव चर्चेकरता जात. 'मं. वि.' चं तेव्हा बडोद्याच्या 'अलोचने'मधून पु. ल., ते स्वत: आणि अळुरकर मिळून 'पुरुषराज अलुरकर' या नावाने संयुक्त लेखन व्हायचं. फार गाजलं होते ते. त्यातल्या 'राज' म्हणजे राजाध्यक्षांचं हे मिस्कील लेखन कसं व्हायचं त्याचे मुकुंदराव विद्यार्थी म्हणून कधीकधी साक्षीदार असायचे. इंग्रजी चांगली पुस्तकं राजाध्यक्षांकडूनच त्यांना वाचायला मिळायची... अशा बोलण्यानं रंगलेल्या आठवणी ते 'प्रभुतरुणा'च्या दिवाळी अंकासाठी देणार होते. पण कालाय तस्मै नम:। ! आता हे सगळं केवळ आठवणीतच उरणार.

प्रभुतरुणाची उत्सवी पंच्याहत्तरी, अतिथी संपादकांची संकल्पना, प्रभुतरुणाचा वर्धापनदिन, संपादकपदाच्या पालखीच्या भोईत झालेले बदल यात सक्रीय सहभागी असणारे मुकुंदराव आता आठवणीतच उरणार.

मुकुंदरावांना आमचा सर्वांचा मानाचा मुजरा.

---

## थेंब

थेंब एक दवाचा पडता गुलाबावरी
ठरतो गेंद गुलाबाचा स्वप्नभास
थेंब एक रक्ताचा, जोडी साऱ्या नात्याला
थेंब एक घामाचा, कष्टातून गळतो खास।
थेंब एक अश्रुचा, जो पुसण्यास हात असेल मायेचा
भिजलेले रूमाल, अन् सुजलेले डोळे
अर्थ नसे फुकाचा।
थेंब एक पाण्याचा, तव्यावर पडता
विसरूनी आस्तित्व तयाचे
हवेत विरून गेला।
थेंब पडता कमलदलावर
मोत्यासारखा चमकतो
थेंब पडता अळुच्या पानावर
अळवावरचे पाणी ठरतो।
थेंब पडता शिंपल्यात
मौल्यवान मोती होतो
थेंब पडता वरुणाचा
मातीतून मोती पिकवितो।
थेंब, थेंब बनवितो तळ्याला
थेंब एकच, फरक असे सहवासाचा।।

**-यशोदिनी राणे**


स्त्री अबला नव्हे सबला

# चिंत्या

## ❖ नंदकुमार विजयकर ❖

बरेच दिवस झाले. चिंत्या भेटला नव्हता. ऑफिसला जाताना वाटेत भेट व्हायची. पण गेले काही दिवस त्याला पाहिला नव्हता. तेव्हा ठरवलं, उद्याच्या रविवारी चिंत्याकडे फेरी मारायची. रविवारी सकाळी त्याच्या घरी गेलो. दरवाजा उघडा होता आणि आतून....

''अहो कांदे कुठायत?''

''कांदे?''

''अगं, बटाटे आणलायत.''

''बटाटे कुणी सांगितले होते आणायला?'' घरात गेल्या गेल्याच चिंत्याचा हा कौटुंबीक विसंवाद माझ्या कानी पडला. मला पाहताना चिंत्याची बायको म्हणाली, ''बरं का भावजी तुम्ही आलात ते. आहो काहीतरी सांगा यांना. बाजारहाट कधीही व्यवस्थित करत नाही. एकाच्या ऐवजी दुसरीच वस्तू घेऊन येतात. मिरच्या-कोथिंबिरी आणायला सांगितलं तर नेमकं कोथिंबिरी विसरतात. लिंबं घेऊन येतात. आधीची सुकून चाललायत त्यात ही भर. हात टेकले यांच्या विसराळूपणापुढे.'' वहिनी तणतणत आत गेल्या. मी चिंत्याकडे पाहिलं. निमूटपणे मान खाली घालून ऐकत होता. तसा आमचा मित्र फार गरीब स्वभावाचा. आता काही गोष्टी त्याच्या लक्षात राहत नाहीत आणि मग गफलत होते. चिंत्या तसा तरल मनाचा, सदैव कवितेच्या दुनियेत हरवलेला, शीघ्र कवी! त्याच्या कविता देखील खास प्रकारच्या असतात. एखादी प्रसिद्ध व्यक्ती, पुढारी, लेखक किंवा कवी यांचा जाहीर सत्कार किंवा त्यांचा जन्मदिवस असं काही असलं की चिंत्या तेथे जाऊन धडकतो. त्यांच्यावर स्तुतीपर कविता करून त्यांना अर्पण करतो. त्यात आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्या त्या व्यक्तीचं नाव त्या कवितेत गुंफलेलं असते. म्हणजे 'अटलबिहारी वाजपेयी' यांच्यावरची कविता पाहा. प्रत्येक ओळीतील पहिलं अक्षर घेतलं की अटलजींचं नाव तयार होते. मध्यंतरी त्याने मला एक बऱ्यापैकी कविता ऐकवली होती.

आयुष्य हे<br>
शेगडीतले<br>
जळणारे काळे कोळसे

एवढं म्हणून तो थांबला. मी म्हणालो, ''काय एवढीच कविता?''

''नाही, अजून पुरी व्हायची आहे.'' पुढे जेव्हा जेव्हा त्याची भेट व्हायची तेव्हा तो मोठ्या उत्साहाने सांगायचा, ''अरे ऐक, एक नवीन कविता केलीय.'' नंतर लक्षात आलं, त्याचं 'आयुष्य' त्या चार ओळी पलीकडे काही सरकत नव्हतं.

मी विचार करत होतो, हे चिंत्याच असं का व्हावं? त्याच्या ऑफिसमधली काही मंडळी माझ्या ओळखीची होती. त्याच्याबद्दल ते आदराने बोलायचे, ''अहो, चिंतामणराव आमच्या बॉसच्या खास मर्जीतले. कुठलं स्टेटमेंट कधी बनवायचं, कुठले रिटर्न्स कधी भरायचे हे फक्त चिंतामणरावच सांगू शकतात. सरकारी फाईली कुठून कुठे सरकल्या यांच्या नोंदी चिंतामणरावांकडेच सापडू शकतात.'' ऑफिसात न विसरता सगळी कामे चोख करणारा हा चिंत्या घरात मात्र नुसता घोळ घालून बसायचा. मी चिंत्याच्या बायकोला म्हणालो, ''वहिनी, तुम्ही असं का करत नाही? व्यवस्थित यादी करून द्यायची म्हणजे विसरायचा प्रश्न

नाही.''

''तुम्हाला काय वाटतं मी देत नाही? मूळात यादी न्यायला विसरतात त्याचं काय? परवा तर ह्यांनी कमालच केली.'' असं म्हणून वहिनींनी चिंत्याकडे एक जळजळीत नजर टाकली.

''काय रे चिंत्या काय झालं काय?''

''अहो, ते काय बोलणार? मी सांगते. परवा त्यांना लिस्ट दिली बरं का. बाजारातून सर्व वस्तू हे घेऊन आले. आल्या आल्या मला ऐटीत म्हणतात कसे, सर्व जिन्नसा मोजून घे. एकसुद्धा वस्तू विसरलो नाही. मी पिशवी उघडून बघते तो काय मी सांगितलेली एकही वस्तू त्यात नव्हती.''

''म्हणजे?''

चिंत्या पुढं आला आणि दबक्या आवजात सांगू लागला.

''अरे हिने यादी दिली. विसरू नये म्हणून व्यवस्थित घडी घालून यादीचा कागद पैशाच्या पाकिटात ठेवला''

''बरं मग?''

''मंडईत गेलो. पाकिटातल्या यादीबद्दल विसरूनच गेलो. खिशात हात घातला. हाताला जुनीच यादी लागली. त्याप्रमाणे सर्व जिन्नसा आणल्या.''

''भले शाब्बास!''

''बघा पाहिलंत यांचा पराक्रम आणि तुम्ही म्हणता यादी का देत नाही.''

''मग असं का करत नाही? मोबाईल असेल ना, त्यावरून सांगत जा.''

''मोबाईल?आतापर्यंत दोन मोबाईल हरवून बसलेयत.''

''मोबाईल नकोरे. नसती कटकट. दरवेळेला तो चार्ज करा, बिल भरा, विसरायला होतं. शिवाय बाहेरच्या गोंगाटात नीटसे ऐकूही येत नाही.''

आमची बरीच चर्चा झाली. पण काहीच ताळतंत्र जमेना. वहिनींच्या मते चिंत्या म्हणजे हाताबाहेर गेलेली केस होती. मी चिंत्याकडून परतलो पण मनात एकच विचार होता. यावर काहीतरी उपाय शोधायला हवा.

मी घरी आलो. पण दोनच दिवसांनी चिंत्या धावत घरी आला. धापा टाकत होता.

'काय रे, काय झालं?''

''खूपच घोळ झाला.'' एवढं म्हणून तो गप्प बसला. त्याला बोलणं जमत नव्हतं. मी त्याला पाणी प्यायला दिलं. थोडा शांत झाल्यावर चिंत्या बोलू लागला.

''मोठा घोळ झाला. हिची तब्येत ठीक नव्हती. पित्ताचा त्रास होत होता. मला भूनिंबादी काढा आणण्यास सांगितला. मी निघालो तो ही म्हणाली बाहेर जातायत तर एक चिंचेचा गोळा आणा. कधीपासून आणायचा राहिलेय. त्या कोपऱ्यावरच्या किराणे बाईंच्या दुकानात दोन्ही गोष्टी मिळतील. मी निघालो. मनात सारखं पाठ करत होतो. 'भूनिंबादी काढा', 'चिंचेचा गोळा' भू. का. चिं.गो. असं सारखं घोकत चाललो होतो. दुकानात पोहोचलो. बाईंने विचारले, काय पाहिजे आणि नेमका माझा गोंधळ झाला. मला फक्त 'काढा' आणि 'गोळा' एवढंच आठवत होतं. मी त्या बाईसमोर 'काढा-गोळा,गोळा-काढा' असं काहीसे पुटपुटलो. तिला काही कळत नव्हतं आणि माझं मात्र गोळा-काढा, गोळा-काढा असं चाललं होतं. ती बाई संतापली. तिने नोकराला बोलावलं आणि म्हणाली. 'आधी याला बाहेर काढा' मार खायचं बाकी राहिलं होतं.'' मी चिंत्याकडे पाहिलं. फारच केविलवाणा दिसत होता. या माणसाचं काय करावं हेच सुचेना. मी काहीतरी बोलायचं म्हणून 'चिंत्या तू शंखपुष्पी घेऊन पाहिलंस का? त्याने स्मरणशक्ती वाढते असं म्हणतात.''

''काही उपयोग नाही. ते घेऊन माझी ॲसिडीटी वाढली.''

''हे बघ चिंत्या, तू घाबरू नकोस. आता तू घरी जा. मी बघतो काय करायचं ते. काही तरी उपाय नक्की सापडेल.''

मी आठवडाभर यावर विचार करत होतो. आयुर्वेद, पंचकर्म, होमिओपथि, मानसशास्त्र असे अनेक पर्याय डोक्यात घोळत होते. छे! यापेक्षा काहीतरी वेगळा मार्ग शोधला पाहिजे. योगायोगाने टीव्हीवर संमोहनशास्त्रावरचा एक कार्यक्रम पाहण्यात आला. तेव्हा ठरवलं चिंत्यावर संमोहनाचे उपचार करायचे. मी चिंत्याला विश्वासात घेऊन उपचारासाठी तयार केलं. फक्त वहिनींना याबद्दल आताच काही सांगू नकोस असं बजावलं. न जाणो त्या परवानगी देतील न देतील. आम्ही एका नावाजलेल्या उपचारतज्ज्ञाकडे गेलो. उपचार सुरू झाले. ते महिनाभर चालणार होते. दरम्यान मी कामानिमित्त मुंबईबाहेर गेलो. परत आल्यावर प्रथम चिंत्याकडे गेलो. वहिनी भेटल्या. ''काय वहिनी काय म्हणतात आमचे चिंतामणराव?''

''अहो, आजकाल यांच्यात बरीक बदल जाणवतो,''

''म्हणजे?'' मी मनात जरा घाबरलोच.

''यांचा विसराळूपणा बराच कमी झालाय असं वाटतंय.''

माझं मनावरचं मणाचं ओझं उतरलं. उपचाराचा फायदा होतोय असं जाणवलं. चिंत्या आणि मी एकमेकांकडे बघून हसलो. त्या दिवशी मी निश्चित मनाने घरी गेलो. पण आठवड्याभरात वहिनींचा फोन आला. ''भावोजी जरा घरी येऊन जा. थोडं बोलायचं आहे.''

''का? काय झालं?''

''नाही तुम्ही घरी या मग बोलू.''

वहिनींचा फोन आला आणि मनात चलबिचल व्हायला लागली. चिंत्याने काही भलताच घोळ घातला तर नाही? संमोहनाचा उपाय मी सुचवला होता. वहिनींना त्याची काही कल्पना नव्हती. मी ताबडतोब चिंत्याकडे निघालो. चिंत्या घरी नव्हता.

''बरं झालं भावोजी, तुम्ही आलात ते.''

''काय, झालं काय?''

''अहो हल्ली हे जरा विचित्र वागायला लागलेत!''

''म्हणजे परत विसराळूपणा सुरू झाला की काय?''

''नाही हो, बाजारहाट व्यवस्थित करतात, प्रत्येक वस्तू न विसरता आणतात.''

''मग प्रॉब्लेम काय आहे?''

''अहो आजकाल कुठल्यातरी जुन्या जुन्या गोष्टी आठवून उगाचच माझ्याशी भांडण उकरून काढतात. आता त्यादिवशी आम्ही जेवण आटपून शिळोप्याच्या गोष्टी करत बसलो होतो. अचानक माझ्या मावसभावाला शिव्या घालायला लागले. अहो आमच्या लग्नात शेखरच्या हातून जिलेबीचं ताट उलटलं. यांच्या झब्ब्यावर काही जिलब्या उडाल्या. आता हे सर्व आठवून त्याचा उद्धार चालला होता.''

अरेच्या! हा काही वेगळाच प्रकार होता. ''वहिनी तुम्ही घाबरू नका. मी चिंत्याला समजावतो.'' वहिनींना आश्वासन देऊन मी तेथून निघालो. वाटेत चिंत्याच्या ऑफिसमधला केळकर भेटला.

''नमस्कार!''

''नमस्कार! अहो बरं झालं तुम्ही भेटलात ते. तुमचे मित्र अलीकडे विचित्र वागायला लागलेत.''

''कोण?''

''अहो, आपले चिंतामणराव! बॉस सारखे त्यांच्यावर चिडत असतात. मिनिटापूर्वी कागद कुठे ठेवला हे त्यांना आठवत नाही. एखादी फाईल कुठे गायब करतात ते त्यांचं त्यांनाच ठाऊक. परवा तर त्यांनी कमालच केली. साहेब बाहेर पडत होते तर चिंतामणराव त्यांना म्हणतात कसे 'साहेब, उद्या रुबीचा वाढदिवस आहे. छानसं गिफ्ट आणायला विसरू नका.'

''ही रुबी कोण?''

''साहेबांची सेक्रेटरी. त्यांचं अफेअर होतं. साहेबांची मिसेस ऑफिसमध्ये येऊन रुबीशी भांडली. रुबीला कामावरून काढलं आणि हे प्रकरण बंद झालं. आता या गोष्टीला दहा बारा वर्षे

झाली. पण सर्वांच्यासमोर अचानक बोलल्याने आम्ही सर्वजण चकित झालो. साहेब तर खूप संतापले.'' अरे बापरे! हे सगळं विचित्रच होऊन बसलं होतं. मी चिंत्याला भेटलो. म्हणालो, ''बाबारे! हे उपचार थांबव.'' भीक नको पण कुत्रं आवर अशी अवस्था झाली होती. चिंत्याला ते पटलं आणि मी सुटकेचा एक निश्वास टाकला. ह्या प्रकरणानंतर चिंत्याची आणि माझी भेट झाली नाही. मी महिनाभर सुट्टीवर होतो. सहलीवर जाण्याच्या गडबडीत होतो. परत आल्यावरदेखील चिंत्याकडे जाणं जमलं नाही. आजमात्र चिंत्याला भेटायचं ठरवलं. घरी गेलो. चिंत्या डोक्याला, हाताला बँडेज बांधून बसला होता. ''अरे काय रे हे?'' इतक्यात वहिनी बाहेर आल्या, ''अहो भावोजी तुम्ही इकडे नव्हता पण इकडे काय रामायण घडलं माहीत आहे का?'' ''अरे चिंत्या कोठे पडलास की काय?'' चिंत्या कोपऱ्यातून उठून माझ्याकडे आला. म्हणाला, ''बॉम्बस्फोट!'

''बॉम्बस्फोट?'

''लोकल ट्रेनमध्ये बॉम्बस्फोट झाले. मी माटुंग्याला होतो. आमच्या मागच्या डब्यात स्फोट झाला. एवढा जबरदस्त दणका होता की मी डब्याबाहेर उडालो. काय झालं हे कळलंच नाही. शुद्धीवर आलो तेव्हा हॉस्पिटलमध्ये होतो.''

''अहो भावोजी देवाची कृपा म्हणून हे वाचले. डोक्याला आणि हाताला मार लागला एवढंच. थोडक्यात निभावलं.''

''खरंच देवाची कृपा. संकट टळलं. काय रे बरं आहे ना आता? काळजी घे'' असं म्हणून तेथून निघालो. वाटेत नेहमीप्रमाणे केळकर भेटला, म्हणाला, ''चिंतामणरावांबद्दल कळलं की नाही?''

''हो आताच भेटून आलो. बरं आहे.''

''तसे ते ऑफिसला येतात. पण साहेबांनी त्यांना जास्त काम करू नको म्हणून बजावलं आहे.'' मी म्हणालो, ''चांगली गोष्ट आहे.'' त्यानंतर बरेच दिवस झाले. चिंत्याची आणि माझी गाठ पडली नव्हती. ऑफिसला जायच्या रोजच्या वाटेवर भेट व्हायची पण तेथेही कोठे दिसला नाही. तेव्हा ठरवलं रविवारी चिंत्याकडे एक फेरी मारायची. रविवारी सकाळी त्याच्या घरी गेलो. दरवाजा उघडाच होता आणि आतून

''अहो शर्थ झाली तुमच्यापुढे. नारळ आणायला सांगितला होता ते विसरलात आणि ही एवढी मटार कोणी सांगितली आणायला? किती महाग आहे माहित आहे ना?'' मला पाहताच वहिनींनी गाऱ्हाणं गायला सुरुवात केली. अरेच्चा! पुन्हा तीच सुरुवात. पहिले पाढे पंचाव्वन! हे कसं काय बुवा, हा त्या बॉम्बस्फोटाचा परिणाम तर नव्हे? मी चिंत्याकडे पाहिले. माझ्या मनातले विचार चिंत्याने बरोबर ओळखले. तो एवढंच म्हणाला, ''हो! तेव्हापासून'. कमाल आहे! म्हणजे हरदासाची कथा पुन्हा मूळ पदावर आली. मध्यंतरी संमोहनाच्या जंजाळात गुरफटलेली चिंत्याची गाडी, स्फोटाच्या दणक्याने पुन्हा रुळलेल्या रुळावरून धावू लागली होती. एवढं मात्र खरं की, आठवणीची जुनी मढी उकरून काढण्यापेक्षा वर्तमानातील एक दोन गोष्टी विसरणं केव्हाही चांगलं. पण त्यासाठी चिंत्याला असं डोकं आपटून घ्यावं लागावं हे काही पटेना. मी सुचवलेल्या उपायामुळे फारच घोटाळा झाला होता पण त्यावर हा स्फोटाचा अघोरी उपाय म्हणजे जीवावरच बेतलं होतं. काही का असेना; चिंत्या आता पूर्वीचा चिंत्या झाला होता हे बेस्ट. चिंतामणराव घाबरू नका. डोकं सलामत आहे ना, मग एक दोन वस्तू विसरल्या तरी तुम्हाला माफी आहे.

●

**वात्रटिका**

ट्रॅफिक जॅममध्ये एकदा ॲम्ब्युलन्स अडकली
केकाटून तिच्या घशाची पुरती वाट लागली
ॲम्ब्युलन्समधला हार्ट पेशंट शेवटी बसला उठून
माझ्या आधी हिचाच घसा घ्या म्हणाला तपासून

**-डॉ. सुमन नवलकर**

# पेव्हर (फेवर) ब्लॉक्स

## डॉ. सुमन नवलकर

फुटपाथवर इमारतीच्या कुंपणाच्या कडेला म्युनिसिपालिटीच्या मालवाहू ट्रकमधून पेव्हरब्लॉक्सचा मोठा साठा उतरवला गेला. 'उतरवला' असं म्हणण्याचं कारण असं की तो माल खडी, रेतीसारखा फावड्याने भराभर ओतला गेला नाही. अगदी व्यवस्थितपणे उतरवून व्यवस्थित रचला गेला. पिवळे ब्लॉक्स एकीकडे, लाल दुसरीकडे, एकावर एक, एकाबाजूला एक. छानशा आकाराचे रंगीत ठोकळे. मध्यरात्री कधीतरी माल उतवरला गेला, आणि सकाळी माल पाहून रस्त्याच्या कडेची गोविंदनगर झोपडपट्टी हरखून गेली. म्युनिसिपालिटीचा माल अनेकदा या ठिकाणी उतवरला जातो. रेती, माती, सिमेंट, डांबर, खडी, थोडाफार माल झोपडपट्टीच्या जीर्णोद्धारासाठी लंपासही होतो. पण समुद्रातून वाडगाभर पाणी घेतलं तर समुद्र थोडाच आटणार आहे?

यावेळी मात्र हा रंगीबेरंगी, अनोखा माल पाहून अख्ख्या झोपडपट्टीचे डोळे दिपले. म्युनिसिपालिटीची सकाळ उगवायच्या आधी केव्हाच गोविंदनगरची पहाट उजाडते.

''ए रंग्या, बघ- बघ काय रंगीत माल आलाय बघ.'' बारकूच्या हाळीने रंग्याच्या जोडीला झिप्री, टिंप्या, चिंगी अन् भानू सगळे गोळा झाले. गुहेतला खजिना पाहून अलिबाबाचे डोळे कसे विस्फारित झाले असावेत, याचा नमुना प्रत्येकाच्या डोळ्यात साठलेला.

''घेवा, घेवा, पटापटा घेवा घ्यायच्या तेवड्या इटा.'' बारकूच्या मार्गदर्शनाखाली सेतू बांधताना वानरसेनेने दगड उचललेले असतील तितक्या चपळाईने पेव्हरब्लॉक्स कुठल्याशा सेतूसाठी रवाना व्हायला लागले. ब्लॉक्स तसे जड होते. चपळाई व्हायला हवी तितक्या वेगाने होत नव्हती. पण गोविंदनगरच्या मुलांच्या गरजाही फार मोठ्या होत्या. त्या गरजांमधून ब्लॉक्स उचलायसाठी लागणारी ऊर्जा मिळत होती त्यांना जणू.

एव्हाना सारी झोपडपट्टी खडबडून जागी झाली होती. रंग्याच्या झोपडीचा उजवा पत्रा पार सडला होता. रंग्याच्या जोडीने त्याच्या आयशीने, बापसानेही पेव्हरब्लॉक्स हापसायला सुरुवात केली. फाटक्या पत्र्याच्या आतल्या बाजूने पेव्हरब्लॉक्सची भिंत उभी राहिली. त्यामुळे झोपडीची 'एरिया' जरा कमी झाली, पण पक्क्या भिंतीसाठी तेवढा त्याग तरी करायलाच हवा.

''सा इटा आन रे मान्या पटापट'' मानूच्या आयशीने मानूला सांगितलं. सहा विटा आणायला मानूला तब्बल सहा फेऱ्या माराव्या लागल्या. विटा होत्याच सॉल्लिड. खरंतर मानूच्या ताकदीचा विचार करता बारा फेऱ्यांमध्ये सहा विटा नेणं त्याला अधिक सोईचं पडलं असतं. पण अख्ख्या विटा न्यायच्या म्हटल्यावर ताकद एकवटली त्याने. मानूच्या आयशीला, माणकीला तिची वाकड्या-तिकड्या दगडांची चूल अजिबात पसंत नव्हती. शेजारचा सावित्रीबाईसारखा 'इष्टो' तिला कधीच्यान घ्यायाचा हुता. पण आता तीन-तीन पेव्हरब्लॉक्स छान कलात्मक पद्धतीने मांडून तिने झक्क दोन चुली बनवल्या. भातात थोडी साखर घालून साखरभात बनवायचा बेतही तिने नक्की केला. नव्या चुलीचं 'सेलिब्रेशन!'

झिप्रीच्या आयशीने झोपडीच्या पुढ्यात टिनपाटात झाडं लावल्यात. पण टिनपाटांखाली पाणी साचून राहतं. पाण्याचा निचरा होण्यासाठी काय ठेवावं हा विचार चालूच असायचा तिच्या मनात. पेव्हरब्लॉक्स पाहून हरखलीच ती. झिप्रीच्या बापाला पाठवून तिने चार पिवळे,चार लाल ब्लॉक्स आणवले. पिवळा-लाल-पिवळा-लाल रांगेने मांडून त्यावर टिनपाट रचली. 'टिपाटांखाली त्यांच्या तळाची दगुडचं लई शोभत्यात. आता कुंड्याबी नईन घ्यायाला लागत्याल.''

''टेन्सन घिऊ नगंस.'' परश्या म्हणाला. चांगले डझनभर पेव्हरब्लॉक्स आणून त्याने झोपडीच्या आत एका कोपऱ्यात रचले. थोडं पैसे साठलं की थोडं शिमीट आनून याच इटांच्या झक्क कुंड्या बनिवतो बग तुज्या झाडानला ठिवायला.'' मग त्याने टिंपाटांच्या खालच्या अंगाला फाटक्या पत्र्याचा आडोसा करून टिंपाटांखालचे पेव्हरब्लॉक्स कुणाच्या नजरेत येऊ नयेत अशी सोय केली.

लक्सुमी पाठच्या बिल्डिंगीत घरकामं करायला जाते. सहाव्या मजल्यावरच्या शेठाणीच्या नातवाची संडासला बसायसाठी लाल रंगाची 'पॉटी' आहे. पोटुशी असल्यापास्नं लक्सुमीने ठरवलं होतं की आपल्या पोरासाठी पण असंच काही आणायचं. कुठून आणलं, कितीला आणलं- सगळं विचारून ठेवलं होतं तिने. पण अजूनपर्यंत दुकानापर्यंत जाऊन यायचे बसभाड्याचे पैसेही साठले नव्हते तिच्याजवळ. पॉटीसाठीचे पैसे तर पुढचीच गोष्ट. लक्सुमीचा लहान्या वर्षाचा झालाय. एवढ्यात पॉटी आली नाही, तर लहान्या मोठा होईल आणि पॉटीची हौस मग पुढच्या बाळात पुरवावी लागेल. पुढल्या बाळाच्या कल्पनेने लक्सुमीला असं काही धस्स झालं की तिने स्वतःच लगाबगा जाऊन चार पेव्हरब्लॉक्स आणले. लालच रंगाचे. मग दोन पेव्हरब्लॉक्स एका शेजारी एक अशा कोनात रचले, की इंग्रजी 'यू' आकार झाला. मग त्यावर आणखी दोन पेव्हरब्लॉक्स एकावरएक ठेवले. तसा काही 'पॉटी' म्हणून आदर्श आकार झाला नव्हता. पण त्यावर एकदा का लहान्याला बसवलं की पूर्ण कार्यक्रम आटोपेपर्यंत लहान्याने हलायची सोय नाही. कारण त्याचे पाय एकमेकांपासून दूर आणि अधांतरी लटकत असणार. म्हणजे पॉटीवरून उठणं तसं कठीणच.

आयेशा, लाखी आणि चिंगा रोज फूटपाथवर खडूने चौकोन आखून टिक्कर खेळतात. रात्री अंथरुण घालायसाठी फूटपाथवर झाडलोट झाली की चौकोन पुसले जातात. मग तिघींनी ठरवलं की याच रंगीत विटांनी टिक्कर खेळायसाठी कायमचे चौकोन करावे. पण ही योजना बारगळली. कारण तेवढ्या भागातल्या फूटपाथची उंचीच वाढणार म्हणजे सगळ्यांच्या, अगदी म्युन्सिपालटीवाल्यांच्या पण डोळ्यात येणारच. पण त्यांची इच्छा खुद्द म्युन्सिपालिटीनेच पूर्ण केली.

सकाळी उशीराने म्युन्सिपालटीची गाडी आली. फूटपाथची पातळी भरणी घालून एकसारखी करून त्यावर लाल-पिवळे-लाल-पिवळे पेव्हरब्लॉक्स छान पट्ट्या-पट्ट्यांच्या नक्षीत लावले गेले. मुलीच त्या. तडजोडीचं तंत्र बाळकडूतूनच प्यायलेल्या. पट्टे-तर पट्टे; पट्ट्यांमध्ये खेळता येईल असा नवा खेळ सुरू केला त्यांनी. टिक्कराचा दगड पेव्हरब्लॉक्सच्या खाच्यात अडकायला लागलाय म्हटल्यावर टिक्करचा खेळच रद्द. मग तिघींनी तीन पट्टे वाटून घेतले, तिथेच झाडांची पानं कुटून चटणी बनवणं, खोटीखोटी जेवणं बनवणं, शाळा-शाळा, शेती-शेती रमवतात जीव.

रात्री कोणी कुठे पथारी टाकावी यावरून गोविंदनगर झोपडपट्टीत नेहमीच भांडणं व्हायची. पण आता म्युन्सिपालटीनेच पट्टे आखून दिलेत म्हटल्यावर जो-तो आपापल्या पट्ट्यात पथारी टाकून झोपी जातो.

झित्र्याबाबांनी गोविंदनगरच्या मध्यभागी वडाच्या झाडाखाली कुठूनसा गोल दगड आणून त्याची स्थापना केली. त्याला शेंदूर फासलाय, सकाळ-

संध्याकाळ ते देवळापाशीच असतात. म्युन्सिपालटीच्या कोपऱ्यावरच्या बागेतून पानं-फुलं आणून त्या दगडाला वाहतात. झाडाच्या बुंध्याशी असलेल्या खाचेत स्थापन केला तरी पावसापाण्यात दगड भिजतोच. मग पेव्हरब्लॉक्सच्या गंगेत झित्र्याबाबांनीही हात धुतले. पोरांच्या मदतीने झाडाच्या चबुतऱ्यावर पेव्हरब्लॉक्सचा छोटा चौथरा केला. त्याच्या तीन बाजूंनी पेव्हरब्लॉक्सच्या भिंती करून सुरेखसं देऊळ अर्ध्या तासात बांधून घेतलं. पेव्हरब्लॉक्सचं छत मात्र बांधता येईना. मग जुन्या फूटपाथवरची एक मोठीशी शहाबादी फरशी गेल्यावेळी नवीन फूटपाथ झाले तेव्हा त्यांनी होईल म्हणून झोपडीच्या कोपऱ्यात ठेवली होती. ती आणून तीच मंदिरात छत म्हणून ठेवली. नव्या कॉलनीत नवं मंदिर.

गोविंदनगरवासियांनी एकजुटीने, एकमताने ठरवलंय की पावसाळ्यात झोपडीत पाणी भरतं, ते टाळायचं असेल तर पुढल्या वेळी नवा मला घेऊन लॉरी आली की अख्ख्या गोविंदनगरच्या जमिनीची पातळीच कमीत-कमी दोन पेव्हरब्लॉक्सच्या उंचीइतकी वाढवायची. एका रात्रीत तर हे जमणार नाहीये. कारण झोपड्यांचे दरवाजे, खिडक्या, भिंती, छत- सगळंच पुन्हा नव्या उंचीवर लावावं लागेल. त्यामुळे आधी मालाचा साठा झोपडीच्या मागच्या अंगाला करून ठेवायचा आणि मग हळुहळू एकेका झोपडीचं पुनर्वसन करायचं.

म्युन्सिपालटीच्या कामगारांनी पेव्हरब्लॉक्स कसे लावले ती सफाईही गोविंदनगरवासियांनी नजरेने आत्मसात केलीय. आता फक्त प्रतिक्षा आहे ती लॉरीच्या आगमनाची.

तूर्तास पेव्हरब्लॉक्सनी एक फेवर केलंय. गोविंदनगर गुण्या-गोविंदाने नांदू लागलंय.



# नातवंडांत रमते मी

## ❖ डॉ. मीनाक्षी देसाई ❖

एऽऽ एऽऽ आवाज आला. आधी लक्षच दिले नाही. मग लक्ष गेले तर माझी दहा अकरा महिन्यांची नात जोरजोराने आपल्या भाषेत हाका मारीत होती. साद नसती दिली तर फुरंगटून बसली असती. बाईसाहेबांना पाचकुटल्याशिवाय पुढे जाणे शक्यच नाही. छोटा नातूही तसाच हाका मारणारा, लक्ष वेधणारा.

काय, गंमत आहे नं! एवढ्याशा बाळातही अस्मिता, अहं आहेच. कुणाचा लाजरा, कुणाचा आक्रमक! याचे दर्शन कधी रुसवा, कधी गाल फुगवणे, सगळंच कसं विलोभनीय! मुलं तशी हुशार. आपल्या डोळ्यांतले कौतुक, वाहवा, वा, वा, म्हणत केलेले कौतुक त्यांच्यातल्या, लपलेल्या नाना कळा बाहेर काढते. कुणी तबल्यावर थाप मारावी त्याप्रमाणे जे हाताला लागेल ते आणि मिळेल त्या जागी जोरजोराने बडवीत असतात. कुणी स्वत:भोवती गोल गिरक्या घेतात, कुणाला लयीत डोलण्याची लहर येते, डान्स कर सांगितले की शरीराची गमतीदार हालचाल सुरू. कधी हात वर करून आणि कधी एक बोट समोर धरून एक नवीच अदा दाखवतात. त्यांच्या हावभावात काय अफाट ताकद असते हो! त्यांना काय म्हणायचे आहे ते आपल्याला चांगले समजते. तसेच त्यांची समजण्याची शक्तीही प्रचंड असते. समोरच्याची अलिप्तता वा प्रेम, वात्सल्य, कौतुक ते पटकन ओळखतात. साहजिकच प्रेमाच्या, कौतुकाच्या वातावरणाने मोकळेपणाने भरपूर मस्तीही करतात. लहर आली की खेळता खेळता आपल्याला चिकटतात. जवळ घेऊन थोपटले, पापी घेतली की बाळं खुश आणि आपणही खुश. ही बाळं इतकी गोड गोड हसतात की आपल्याला आपोआप हसू फुटलंच म्हणून समजा. किती संसर्गजन्य असते हो लोभस निरागस हसणं: अहो मग हसण्याची जुगलबंदी. काहीही कारण लागत नाही त्याला. मग आपल्याला काही अडचणी, समस्या आहेत, आपला मूड खराब आहे, वगैरे सर्व साफ विसरले जाते. आणि होते सर्व लाफिंग क्लबची ऐशीतैशी!

एक दिवस बादलीत ठेवलेले धुवायचे कपडे तिने बाहेर काढले. बादली कलंडली. बादली सारखी करायचा प्रयत्न करून बाळ दमली आणि हिरमुसली होऊन गेली.

त्या दिवशी माझ्या खोलीच्या दारापर्यंत येऊन नात मला काहीतरी सांगून गेली. चार पावले लगेच परत वळून बोटाने बजावत परत काहीतरी बोलून (आ आऽऽ) करून गेली. मी हो हो ह्या अर्थी मानही हलवली आणि तोंडानेही हो हो बोलले आणि बाळ निश्चितपणे खेळायला गेली.

पाच वर्षाचा आरीत कधी सुपरमॅन, कधी स्पायडरमॅन तर कधी पॉवर रेंजर! पण कधी कधी ह्याला हट्ट आणि हट्टच सुचतो. मग तार स्वरात 'रडू'राग सुरू. खरं म्हणजे मला तेव्हासुद्धा हसूच फुटते. पण ते दाबणे जरूरीचे. नाहीतर आमचा इगो दुखावतो हो! मग त्याच्यातल्या पॉवर रेंजरला आवाहन करावे लागते. 'अरे, असला रडूबाई पॉवर रेंजर, आजीला कसा सांभाळणार, तिचे रक्षण कोण करणार वगैरे. लगेच आमच्यात पॉवर रेंजर संचारतो. तलवारीचे हात, कराटेचे हातवारे वगैरे सुरु, आपण मारलेला मस्का, पॉवररेंजरचे

जगणे रडवेलेपणा पळवतात आणि परत हास्याचा खळखळाट सुरू होतो. बाळाच्या अपेक्षा फार नसल्यामुळे या असल्या मात्रा उपयोगी पडतात.

कधी आम्ही जादूगार होतो. जादू कधी पत्त्यांची, कधी हातातली वस्तू गायब करण्याची! आजी चकीत होणार नाही तर काय! आजीच्या फजितीच्या टाळ्या वाजायला लागतात. आजीचे रडवेलेपणाचे नाटक संपून दोघांच्या हसण्याचा गडगडाट केव्हा सुरू होतो ते कळतच नाही.

काही वेळा आजीने काढलेली ए, बी, सी ह्या टिचरच्या मनाला येत नाही. काही वेळा एक ते शंभर नंबरची परीक्षा. टिचर विशेष खूष दिसत नाहीत. पण खरंच कितीतरी आधुनिक विषयांची ए, बी,सी.डी मला माहिती नाही. आणि ह्या महागाईच्या दिवसात महिन्याची दोन टोके जुळवताना शंभरची मोजणीही गडगडते. छे, छे हे भलतंच काय डोक्यात आले! जाऊ द्या. तर मी काय सांगत होते. हे छोटे टिचर ए,बी,सीवरून नंबरवर, नंबरवरून ड्रॉईंगवर, ड्रॉईंगवरून योगावर उड्या मारत असतात. मध्येच स्टोरी रीडिंग टपकते. आपल्यालाही ह्याच गतीने धावल्याशिवाय आपला निभाव लागत नाही.

नेहा तर काय; क्रिएटिव्ह शिक, कुठे मण्यांच्या माळा बनव, कुठे भरतकाम शिक, कुठे ड्रॉईंग कर आणि ह्याच्या जोडीला स्नॅक्स बनवायचे चालतात, गप्पा तिचा अत्यंत आवडीचा विषय. शाळेत काय झालं, काय केलं, कोणाला किती, काय थापा मारल्या, कोणाच्या फिरक्या घेतल्या आदीचे साग्रसंगीत वर्णन ऐकवले जाते. आणि ह्या गप्पात टिचर विषय अनिवार्य. त्यांच्याबद्दल भरभरून अर्थात चांगले वाईट दोन्ही बोलले जाते.

मोहकची तऱ्हा आणखीनच निराळी. तो आजीला जेफ हार्डी बनवू पाहतो. ही फाईट अशी मारायची, उडी अशी मारायची, एवढ्यावरच भागत नाही; तर तो आजीला फुटबॉल प्लेयर बनवायला निघतो. फुटबॉल खेळून आला की, आजीची ट्यूशन सुरू. ही किक अशी मारायची, बॉल डोक्याने अडवायचा, उल्टी किक शिकलीच पाहिजे, बॉल मानेवर कसा बॅलन्स करायचा वगैरे प्रात्यक्षिक हॉलमध्येच. कपाटाच्या काचा, फ्लॉवरपॉटस् फुटतील वगैरेंच्या गावीच नसतो तो. भान न राहून जोरात किक् मारली की मामीचा आतून दम येतो, 'नो फुटबॉल इन द हॉल'. हो हो करत थोडा वेळ फुटबॉलला विश्रांती.

'आजी, ए आजी!' आरीतच्या हाका. फर्मान निघाले आता योगा शिकवतो मी तुला. अरे बापरे ह्या विद्यार्थ्याला योगाला जायलाच पाहिजे. हो नाहीतर उगाच ॲब्सेन्टी लागायची आणि शिक्षासुद्धा व्हायची. नको रे बाबा हे संकट! तेव्हा बाय्!

❑

## Doomed Childhood

Who am I?  
& where was I born?  
Who gave me birth?  
& left me upon this cruel earth?  
These questions surround my troubled life…  
Stabbing my mind like hot knives,  
Why must I work in the hot sun?  
Other kids play, While my hands burn.  
I too, wish to enjoy & play,  
Instead of making pots of clay.  
My heart's desire is a pen,  
Not heavy tools for working with cruel men.  
But who will pay heed to my tears?  
You live like kings & have no fear.  
But why should I alone trude and toil?  
Unheard cries like day & night,  
This is the life of a child laborer.

**- Mithil Welkar**


पूर्वी
₹
॥ कालाय तस्मै नमः ॥
आत्ता
₹
प्रदीप केदारे

# हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतातील घराणी व त्यांची वैशिष्ट्ये

❖ पं. सुजन राणे ❖

दिवाळी म्हणजे हिंदुंचा सर्वात आनंदाचा सण. ह्या पाच दिवसांच्या सणावारी आपण हिंदू जगाच्या कुठल्याही कानाकोपऱ्यात असोत, आपला आनंद सर्व प्रकारे उपभोगत असतो. मग नवे कपडे व दागिने खरीदण्यापासून ते घरी निरनिराळ्या पक्वान्नांवर ताव मारण्यापर्यंत किंवा एखादं चांगलं नाटक बघण्यात किंवा गोड गाण्याचा कार्यक्रम ऐकण्यात हे पाच दिवस घालवत असतो. दिवाळीचा संबंध दिव्याशी आहे हे सर्वश्रुत आहे, थोडक्यात उजेडाशी आहे. हिंदू आपली घरं दिव्यांनी सजवत असतात. उजेड हा अंधकार व अज्ञान दूर करण्याचं द्योतक आहे, असं ह्या संदर्भात लिहीलं गेलं आहे. किंबहुना उजेड ही जगाचं सौंदर्य दाखवणारी एक खिडकी आहे, असं कुठेतरी वाचल्यासारखं वाटतं. ``Light is a window to world's beauty."

दिवाळी ह्या सणाच्या धार्मिक बाजूचा विचार केला तर आपल्याला माहीत आहे की हा सण साजरा करण्याचं मुख्य कारण म्हणजे प्रभू रामचंद्र रावणाचा वध करून १४ वर्षांनंतर आयोध्येला परतले, तर श्रीकृष्णानी नरकासुराला नष्ट केले. जैन धर्माप्रमाणे महावीरांनी इ.स. ५२८ पूर्वी मोक्ष गाठला तर शीख धर्मगुरू गोविंद सिंग ५२ हिंदू राजांची सुटका करून अमृतसरला या दिनी परतले. दिवाळी अश्विन महिन्याच्या शेवटापासून (२९ किंवा १४ कृष्णपक्षापासून) ते कार्तिक महिन्याच्या सुरुवातीपर्यंत (२ कार्तिक किंवा २ शुक्लपक्षापर्यंत) साजरी केली जाते. असो. या सर्वाचा अर्थ येवढाच की आपल्या धर्माच्या दृष्टीने हा सण सर्वात महत्त्वाचा असून आपण या सणाचा जेवढा आणि जेवढ्याप्रकारे आनंद उपभोगता येईल याचा प्रयत्न करत असतो.

मी एक शास्त्रोक्त गायक असल्यामुळे दिवाळीच्या आनंदाकडे गाण्याच्या दृष्टीकोनातून पहावं, शास्त्रीय संगीताचा विचार करावा, त्यातील घराण्यांचा आढावा घ्यावा आणि त्या अनुषंगाने त्याबद्दल उपयुक्त माहिती वाचकांपुढे मांडावी असं वाटणं साहजिक आहे. आपलं शास्त्रीय संगीत थोर आहे. ते वेदांपासून चालत आलं आहे. ऋग्वेदाच्या तीन सुरांपासून ते सामवेदाच्या सात सुरापर्यंत ते विकसित झालं आहे. 'सप्त सुरांतू गीयन्ते। सामभि: सामर्ग बुधै:।।' असा उल्लेख मांडुकीय शिक्षा ग्रंथात आढळतो. याचा आणखी एक पुरावा म्हणजे ऋग्वेदातील पाणिनीय शिक्षा या ग्रंथात खालील श्लोकात सापडतो.

*''उदात्ते निशाद गान्धारौ । अनुदाते रुशाद धैवत:।*
*स्वरीत प्रभवहिते। षड्ज, मध्यम, पंचम:।''*

या प्रमाणे ऋग्वेदातील तीन सुरात सात सुरांचा मिलाप खालीलप्रमाणे मानला जातो.

उदात्त सूर- निशाद व गंधार (नि व ग)
अनुदात्त सूर- ऋषभ व धैवत (रे व ध)
स्वरीत सूर- (षड्ज, मध्यम व पंचम (सा, म, व, प)

हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताचा उगम जरी वेदांपासून झाला तरी त्याचा खरा प्रसार मोगलांच्या

आणि राजपुतांच्या दरबारापासून झाला असे इतिहास सांगतो व ते उघड आहे. कारण स्वामी हरिदास, तानसेन, बिलासखान व बैजू हे सर्व गवई त्या काळी होऊन गेले हे आपल्या सर्वांना माहीत आहे. ह्या काळी द्रुपद-धम्मारसारखी गायकी प्रचलित होती. पण ती लोप पावली. कारण त्यात नोम-तोमचा तोचतोचपणा कंटाळवाणा होता. इ.स.च्या १७०० सालापासून हिंदुस्थानी ख्याल गायकी अस्तित्वात आली आणि ती अद्यापपर्यंत रूढ आहे. याच सुमारास हिंदुस्थानी शास्त्रीय गाण्यातील घराण्यांचासुद्धा जन्म झाला असं म्हणायला हरकत नाही. या घराण्यांचे संस्थापक ज्या शहरात किंवा ज्या राजपदरी राहत होते त्यावरून तश्या घराण्यांना सनदा मिळाल्या. शास्त्रीय संगीतात मुख्य चार घराणी आहेत व ती म्हणजे ग्वाल्हेर, जयपूर, आग्रा व किराणा. या नंतर जी घराणी अस्तित्वात आली ती या चार घराण्यांच्या मिश्रणातून झाली असं म्हणायला हरकत नाही. या सर्व घराण्यांचे मुख्य गवयी व त्यांचा शिष्यपरिवार यांचा थोडक्यात उल्लेख करणे उचित होईल. नत्थन पीर बक्ष (साधारण इ.स. १७००) हे ग्वाल्हेर घराण्याचे संस्थापक मानले जातात. या घराण्याचे मुख्य गवई हस्सू खान (पै १८५९) व हद्दू खान (पै.१८७५), त्यानंतरचे गवई रहमत खान (१८५२-१९२२), इनायत हुसेन, शंकरराव पंडित (१८६२-१९१७) बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर (१८४९-१९२७) विष्णू दिगंबर पलुस्कर (१९७२-१९३१) रामकृष्णबुवा वझे (१८७१-१९४५) मिराशीबुवा (१८८३-१९६६) आणि गेल्या दुसऱ्या अर्धशतकाच्या व हल्लीच्या नावाजलेल्या काही गवयांची नावे म्हणजे ओंकारनाथ ठाकूर, विनायकराव पटवर्धन, कुमार गंधर्व, सी. आर. व्यास व वीणा सहस्त्रबुद्धे अशी आहेत. जयपूर (किंवा अत्रौली) घराण्याचा विचार केला तर आपल्याला असं सापडतं की दौलत खान, अहमद खान व जहांगीर खान (जवळजवळ इ.स. १७००) ह्या गवयांनी या घराण्याची सुरुवात केली. परंतु या घराण्याचे मुख्य गवई म्हणून अल्लादिया खान (१८५५-१९४६) याचं नाव घेतलं जाते. त्यांचे शिष्य भास्करबुवा बखले (१८६९-१९२२) यांचं नाव विशेष घेतलं जाते. अल्लादिया खांचे सुपुत्र मंजी खान व भुर्जी खान, यांच्यानंतर प्रसिद्ध गाणाऱ्या म्हणजे केसरबाई केरकर (१८९२-१९७७) व मोगुबाई कुर्डीकर (१९०४-१९९६?) यांची नावे घ्यावी लागतील. या घराण्यातील हल्लीच्या नावाजलेल्या गाणाऱ्या म्हणजे किशोरी अमोणकर, पद्मा तळवळकर, अश्विनी भिडे व श्रुती सडोलीकर ही होत. आता आपण आग्रा घराण्याकडे वळलो तर आपल्याला जंगू खान (१७८१-८५२) व घग्गे खुदा बक्ष (१७९०-१८८०) या घराण्याचे संस्थापक म्हणून सापडतात. या घराण्याच्या गवयांनी विशेष प्रसिद्धी मिळवली ते फैय्याद खान (१८८६-१९५०), विलायत हुसेन खान (१८९२-१९६२) व नंने खान (१८९९-१९४५) अशी आहेत. शराफत, लताफत, अन्वर आणि खादीम हुसेन (सर्व १९०० सुरुवातीपासून ते १९९३) यांची नावे घेणे क्रमप्राप्त आहे. हल्लीच्या काळातील या घराण्याच्या नावारुपाला आलेल्यापैकी गाणाऱ्यांची नावे म्हणजे माणिक वर्मा, जगन्नाथबुवा पुरोहित व जितेंद्र अभिषेकी. शेवटी राहिले किराणा घराणं. याची सुरुवात गाझी खान (जवळजवळ १७००) यांच्यापासून झाली. या घराण्यातील नावे घेण्यासारखे गवई म्हणजे काले खान (१८००) आणि त्यांचे सुपुत्र व महान गवई खांसाहेब अब्दुल करीम खान (१८७२-१९३७), त्यांची गाणारी मुलं सुरेशबाबू माने, हिराबाई बडोदेकर (१९०५-१९८९), कमलाबाई व सरस्वतीबाई राणे, अब्दुल करीम खांचे नावाजलेले शिष्य म्हणजे सवाई गंधर्व, मुळेबुवा, बेहेरेबुवा, जावकरबुवा, गणपतराव गुरव, रोशनारा बेगम, शंकरराव सरनाईक आणि कपिलेश्वरीबुवा. यांच्या नंतरची गेल्या व चालू शतकातील पिढी म्हणजे

भारतरत्न पं. भीमसेन जोशी. पं. फिरोज दस्तूर, गंगुबाई हंगल, जसराज राजगुरू व संगमेश्वर गुरव.

वर हिंदुस्तानी शास्त्रीय संगीतातील घराण्याप्रमाणे गवयांची नामावली दिली आहे. पण या घराण्यांना येवढं महत्त्व का? कारण ही सर्व गवई मंडळी सात शुद्ध सूर (सा, रे, ग, म, प, ध, नी) चार कोमल सूर (रे, ग, ध, नी) व एक तीव्र सूर (म) असे मिळून १२ सुरांचा आधार घेऊनच शेवटी आपले राग सादर करत असतात. परंतु हे Over simplification झालं, कारण जरी दोन निरनिराळ्या घराण्याच्या गवयांनी एखादा राग सादर करताना तेच सूर वापरले तरी कशाप्रकारे ते गायले जातात याला महत्त्व आहे. त्यात हळूवारपणा, मृदूपणा, जोरकसपणा या सर्व अंगांचा कसा वापर केला जातो, एखादा सूर किती कमी किंवा जास्त ताणला जातो या सर्व गोष्टीमुळे राग जरी तोच असला तरी तो त्या दोन गवयांच्या गळ्यात वेगळा वाटतो. शिवाय हिंदुस्तानी शास्त्रीय संगीतात श्रुतींचा (MICRO NOTES) उपयोग मोठ्या कौशल्याने केल्यामुळे एखादा राग श्रवणीय किंवा कंटाळवाणा वाटतो. आता आपल्याला या घराण्यांच्या वैशिष्ट्यांकडे पाहिलं पाहिजे. सर्वप्रथम एखाद्या गायकीला घराणं केव्हा म्हटलं जाते? प्रसिद्ध संगीत समीक्षक वामनराव देशपांडे यांच्या मतानुसार (Ref:-Indian Music tradition) कमीतकमी तीन पिढ्यांनी चालू ठेवलेल्या गायकीला घराणे म्हणणे योग्य होईल. ते असंसुद्धा म्हणतात की घराणं हे एखाद्या संगीतातील कुटुंबाशी किंवा त्यांच्या नातेवाईकांशी निगडीत असलेली गायकी. पण हा एक मतप्रवाह आहे कारण एखाद्या घराण्याशी जोडलेला बाहेरचा शिष्यपरिवार होऊ शकतो. ग्वाल्हेर घराण्याची वैशिष्ट्य म्हणजे यमन, अल्लैय्या-बिलावल, भैरव, सारंग, मुलतानी, हमीर, कामोद, शंकरा वगैरे सारखे लोकांना परिचयाचे राग गाणे. रागाचं सादरीकरण सोपे, सुबक, रागांच्या सौंदर्याला बाधा येणार नाही असं असावं, म्हणजे श्रोत्यांना ते लवकर कळावे व त्यांना त्यातला आनंद लुटता यावा. या घराण्यात रागांच्या बंदिशीना फार महत्त्व दिलं जाते. शास्त्रीय संगीत हे बंदिशीचं गाणं आहे असं ह्या घराण्याचं ब्रीदवाक्य आहे. रागाच्या १५ ते २० बंदिशी शिष्याकडून तयार करून घेणे क्रमप्राप्त समजलं जाते. तसेच अस्थाई आणि अंतरा पूर्ण व चांगल्या गायल्यानंतरच रागाचा विस्तार करावा अशी ह्या घराण्याची धारणा आहे. हा विस्तार आकारामध्ये, अमुक क्रमाने व विलंबित लयीमध्ये गायला जातो व त्याला ते बेहेलावा असं संबोधतात. बेहेलावानंतर एकावेळी दोन किंवा चार सूर दुप्पट लयीमध्ये गाऊन झाल्यानंतर बंदिशीचे बोल आलापाच्या आणि तानेच्या माध्यमातून गायले जातात. या घराण्याचं दुसरे वैशिष्ट्य म्हणजे सरळ व सपाट ताना. या घराण्याचं तिसरे वैशिष्ट्य म्हणजे मध्य लयीत गाणं, कारण या लयीत गाणं चांगलं सादर करता येते. विलंबित बंदिशी ते तिल्वाडा, झुमरा व एकताल आणि द्रुत बंदिशी तीन ताल किंवा एकतालमध्ये गायचं पसंत करतात.

जयपूर किंवा अत्रौली घराण्याची वैशिष्ट्यं पाहिली तर आपल्याला असं आढळते की या घराण्यातले गवई अनोळखी व अनवट राग गाण्याचं पसंत करतात. तसंच ते बसंत-केदार, संपूर्ण-मालकौंस, बसंत-बहार, कौशी-कानडा, नट-कामोद असे जोड राग गातात. त्यांचं गाणं हृदयाला भिडण्यापेक्षा बुद्धीला चालना देण्यासारखं आहे. बंदिशी गायल्यानंतर ते आलाप व ताना आकारामध्ये जास्त गाताना आढळतात. त्यांच्या ताना कठीण व वक्र असतात. या घराण्यातल्या गवयांना रागांची बढत विलंबित लयीमध्ये करायला आवडते आणि तशी ती लय ते शेवटपर्यंत ठेवतात. बंदिशीचे बोल गाण्याकडे त्यांचा कल नसतो. ते शक्यतो आपलं गाणं आकारामध्ये गाण्याचं पसंत करतात. आवाजाचा लगाव जोरकस व खुला असावा असं या घराण्यांच्या गवयाचं मत आहे.

त्याचप्रमाणं पारंपारिक चीजा गाण्याकडे त्यांचा कल असतो. ते नव्या चीजा बांधण्याच्या भानगडीत पडत नाहीत. रागाची बढत करताना चीजेचा अर्थ शब्दाच्या माध्यमापेक्षा रागाच्या व तालाच्या माध्यमातून व्यक्त करावा असं त्यांचं म्हणणं आहे. चीज ही रागाच्या सुरांना व बंदिशीच्या तालाला दुय्यम आहे. तालांच्या मात्रा विलंबित लयीमध्येसुद्धा ते फार प्रकर्षाने पाळतात. कित्येकदा ह्या घराण्याचं गाणं क्लिष्ट व नीरस वाटते कारण ह्या घराण्याचे गवई गाण्याकडे कलेपेक्षा शास्त्राच्या दृष्टीने फार बघतात. या घराण्यातले मल्लिकार्जुन मन्सूर कठीण तानांची व तालावर समेवर येण्याची करामत अति कौशल्याने करत असत.

आग्रा घराण्याचा उगम धृपद-धमार गायकीपासून झाला असं समजलं जातं. कारण या घराण्यातले गवई आपले गाणे नोम-तोम गाऊन सुरू करतात. बराच वेळ नोम-तोम या पद्धतीने जो राग गायला जातो त्या रागातले सूर गाऊन मग तबल्यावर गायला सुरू करतात. बंदिशीचं महत्त्व या घराण्यात पुष्कळ आहे. बंदिशीतले शब्द हे बोल अंगाने फार गायले जातात आणि असं गाताना त्यातील शृंगार रसाशी जणू काय ते खेळत असतात. या संदर्भात उस्ताद फैय्याज खान यांचं नाव अगदी आदराने घेतलं जाते. ते प्रत्येक चीजेतला विशेषत: शृंगार-रस असा काही कौशल्याने आळवत असत की त्याला तोड नाही. ह्या घराण्याचं मुख्य वैशिष्ट्य म्हणजे तालावर प्रभुत्व आणि त्याबरोबर निरनिराळ्या लयीत गाण्याची तय्यारी. एक विशिष्ट ठसक्यात लयीत गायचं आणि एका नखऱ्यात समेवर यायचं अशी या घराण्याची पद्धत आहे. लयकारीत गाणं गायचं ही ह्या घराण्याची खासियत आहे आणि असं करताना बंदिशीतले बोल निरनिराळ्या बाजूने शृंगारीत करायचे असंसुद्धा म्हणावं लागेल. आलापाला या गायकीत फार महत्त्व दिलं जाते. जास्त करून आलाप मंद्र सप्तकात व एका वजनात गायले जातात. पण ह्या घराण्याचे गवई आवाज खालच्या सुरात लावतात व जरा मोठ्याने गातात. पण असं करताना एखाद्या रागाच्या उठावाकडे त्यांचं लक्ष असते व त्या रागातल्या भावाला बाधा येणार नाही याचा ते चांगला विचार करतात. ते शक्यतो मध्यलयीत गातात कारण बंदिशीतला भाव नखऱ्यात गाताना अशी लय पूरक ठरते. ग्वाल्हेर घराण्याप्रमाणे हे घराणं पारंपारिक बंदिशीना चिकटून व त्यातली शुद्धता सांभाळून गातात. त्यांच्या गाण्यात तिहाई म्हणजे चीजेचा मुखडा तीनदा घेऊन समेवर येणं इथे कल असतो. हे गवई गाताना अनेकदा तबलेवाल्यांशी लढत असतात व समेवर निरनिराळ्या प्रकारे येऊन श्रोत्यांना कसं उद्दीप्त करून आनंद देता येईल याचा प्रयास करतात. थोडक्यात हे घराणं शृंगाररस-प्रधान आहे असं म्हणावं लागेल.

किराणा घराण्याचा विचार करताना असं सापडते की या घराण्याचा सुरांशी अति घनिष्ट संबंध आहे. येवढा की या घराण्यातले गवई गाताना सुरांच्या प्रभावामध्ये स्वत:ला हरवतात. सूर हेच सर्वश्रेष्ठ आहेत आणि त्यातून रागातले भाव अगदी पराकोटीला जाऊन व्यक्त केले पाहिजेत अशी यांची स्पष्ट भूमिका असते. म्हणून हे गवई संथ लयीत गाण्याचं पसंत करतात, कारण एकेक सूर हळूहळू आळवत ते पुढच्या सुराकडे सरकतात. द्रुत लयीमध्ये त्यामुळे गाण्याकडे त्यांचा जास्त कल नसतो. या घराण्यातले गवई सुरांशी इतके एकनिष्ठ असतात की ते कित्येकदा बंदिशीतली पहिली ओळ किंवा मुखडा वारंवार गात असतात. बंदिशीतले इतर शब्द गाण्याची त्यांना गरज भासत नाही कारण आपल्या सुरांच्या ताकदीने ते श्रोत्यांना मंत्रमुग्ध करतात. हे गवई सर्वसामान्य श्रोत्यांना परिचयाचे राग नेहमी गात असतात, म्हणजे तोडी, ललत, जीवनपूरी, शुद्ध सारंग, मुलतानी, भीमपलास, पटदीप, पूरियाकल्याण, यमन, पूरिया, बागेश्री, मालकौंस, बसंत दरबारी व अभोगी

तालाला हे दुय्यम समजतात म्हणून विलंबितमधल्या चीजा शक्य तो एकतालात व द्रुत चीजा तीन तालात गातात. यांची गायकी आलापप्रधान मानली जाते म्हणून ताना मोजक्याच गायल्या जातात. तारसप्तकातल्या षड्‌जाशी आपला आवाज ते असा काही भिनवतात की तो तंबोऱ्याशिवाय वेगळा वाटत नाही. आवाज जोरकस न लावता तो जितका मुलायम लावता येईल इथे या गाणाऱ्यांचे लक्ष असते. हे गवई आलाप गोलाकारात गातात. इतर गवयांसारखे सपाट नाही गात.गाणं हे गोड असावं हे त्यांच ब्रीदवाक्य आहे. गाणं ही प्रथम कला आहे व नंतर हे शास्त्र आहे अशी यांची पक्की भूमिका आहे. ह्या घराण्याच्या गाण्यात करुणरस ओतप्रोत भरलेला, किंबहुना तो जणू काय त्यांचा धर्म आहे असा म्हणावं लागेल आणि म्हणून इतर घराण्यांशी तुलना केली तर आपल्याला ही गायकी अधिक व अत्यंत भावनाप्रधान आढळते. आपली गायकी प्रभावी व लोकांच्या मनावर कायमची कोरली जावी म्हणून किराणा घराण्याचे गवई वरच्या सुरात म्हणजे काळी दोन, पांढरी तीन किंवा पांढरी चारमध्ये सुद्धा गातात.त्यांच्या ठुमऱ्यासुद्धा येवढ्या गोड वाटतात की त्या जवळजवळ ख्याल अंगानेच गायल्या जातात. या घराण्याचे अध्वर्यू खांसाहेब अब्दुल करीम खानच्या ठुमऱ्या ऐकताना हृदय पिळवटून निघते, 'गोपाला मेरी करुणा क्यू नही आवे' ही राग सर्परादामधली ठुमरी ऐकताना वाटते की खानसाहेब ईश्वराला आवर्जून विचारतात की बाबारे तुला माझी दया का नाही येत? ही गायकी १८९० पासून त्यांनी प्रसिद्धीस आणली व त्याचा प्रसार सबंध हिंदुस्थानात केला. उत्तर हिंदुस्थानातून किराणा या गावातून येऊन ते बडोद्याच्या राजदरबारी राजगवई झाले. पण शेवटी महाराष्ट्रात स्थायिक होऊन मोठा शिष्यपरिवार तयार केला.

❑



# BRANDUCATION TODAY!

Shubhada S. Agaskar
(neè Ms. Vaishali M. Jayakar)

Sandhya woke up in a sweat. Blinking at the bedside clock, she swore softly. It was 5:30 a.m. on a Monday, and she had just realized that she had forgotten to make Sachin's project. And that too on a Purple Day. This meant that she would have to now iron his purple Lilliput outfit and also download information about robots from the Internet, all in double time-and all before 7:00 a.m.- by which time the school bus would normally arrive.

Ever since she had enrolled her son in Pine Crest International School, her days had passed by in a blur and her nights were full of nightmares. She rued the day her neighbour-Mrs.Khanna, had told her about the posh school that her 3 daughters attended. Sandhya's husband –Arun-worked for an MNC, while she was a senior executive with a foreign bank. They lived in Powai, where one-upmanship was the standard. Her ears burning with Mrs.Khanna's words "My daughters love their new school, it has its own tennis court and swimming pool, and they wear such smart uniforms". She had nagged away at Arun, until he agreed to enroll their son in Pine Crest International School.

Getting in had not been easy. They had been called for an initial interview, where they had to fill in details like their educational qualifications, where they currently worked, their current salaries, etc…. They were then told that based on the data provided, parents would be short-listed and would be called for the next interview. The call came on a day when she had a briefing scheduled with her boss, and Arun had an important presentation to submit the next day. But the urge to say that her son attended the prestigious Pine Crest International School was too much and she managed to juggle her commitments. In the process, she had to also emotionally blackmail Arun into accompanying her for the interview. She had dressed up Sachin in a smart yellow shirt and blue jeans and had warned him to be at his best behavior.

When they reached the school, they were issued guest passes by the security. They joined a select group of parents and kids, who were already waiting for their interviews. Sandhya looked around. Surely that woman was carrying a Prada handbag! And that man-he seemed to be wearing a Tag-Heuer watch. The lady in the corner wore Jimmy Choo shoes. The children too seemed to be wearing the latest trends. Even though Sandhya and Arun earned well, they had never gone the designer way, until now. Arun whispered in her ear "Are you really sure about this?" and for a moment, she had the impulse to say "No. Let's get out of here". Controlling it, she smiled and hissed back at him "Yes. I'm sure."

Finally, their turn arrived and they were ushered into the principal's cabin. To call it a cabin was to actually insult it. A room that had floor length windows with silk curtains, a plush sofa set and what appeared to be an Anjolie Ela Menon on the walls, could not be given the humble name of 'cabin'. A tall, plump woman rose from behind the ornate wooden desk and glided towards them. She was wearing a printed silk saree and had a highly polished string of pearls around her neck. She introduced herself-"Hello! I am Mrs. Preeti Shah and you must be the Desai family". Arun nodded and introduced himself and Sandhya.

"This cute child must be Sachin" said Mrs. Shah and gave him a KitKat from the bowl next to her. Sandhya had already prepared him for this and to her relief, Sachin shyly declined. Mrs. Shah raised one eyebrow and then gestured to an aide hovering nearby ordering "Take him to the Nursery". She turned to Sachin. "Do you like to play? Rosie Miss will take you to a room where we have lots of toys. And you will meet some other friends there". Sachin was led away into an adjacent room and Mrs. Shah gestured to the sofa set. "Come, let's be comfortable". They seated themselves and then the questions began "What made you choose Pine Crest International?", "What is a typical day like for Sachin?", "I understand that both of you are working, may I ask for which companies?" etc,etc. As they were replying to this barrage of questions, Mrs. Shah discreetly pushed a button on her armchair and a wooden panel in front of them slowly rose-up. There was a one-way mirror through which they could see Sachin in a large, colorful room that was full of toys. There were other children there too. Some had already made groups and were playing with PlayDoh, while still others were playing on the swing. Sachin loved playing with beach-balls and immediately made his way to one such group and joined them merrily in playing catch-catch.

Sandhya was just sighing in relief when Mrs. Shah turned to Arun and asked "So, Mr. Desai, if we do enroll your son in our school, how much do you think you can donate towards our Destitute Women and Orphans Fund?" It was an awkward moment! Both Sandhya and Arun realized that it was actually a request for donation and they would be rated based on how much they could afford to give. On one side was the excellent amenities provided by the school, as illustrated in the glossy brochure sent along with the interview letter, and on the other side was the subtly veiled request for donation. They both thought fast, most schools took donations and if this one was as good as their neighbors suggested, they might as well go ahead and give one too. A respectable figure was arrived at and finally Sachin secured admission in Pine Crest International.

This was just the beginning. The first day, Sachin came home with a note from his teacher. "Please check the School website for homework instructions and any notices". A daily routine was soon established. Sandhya would reach home at 6:30 p.m. from her job, drop her bags and immediately rush to switch on the computer to check the school website. At first, the notices were easy to follow. "Tomorrow is Red Day. Make sure that your child/ward wears a red shirt/ dress for class". "The children are going to learn about wild animals. Please provide pictures of at least 4 wild animals to glue in their workbooks".

Then slowly the pressure mounted. "Please provide tomato and cheese sandwiches in your child/ward's lunch-box for short recess and potato bhaaji with chappatis for long recess". Sandhya's mother-in-law grumbled "In our day, we decided what to pack in the lunch-box. Don't you think that this is too much?" Sandhya would rush to defend the decree. "Aie, They want them to have a nutritional diet. And besides, we always have these items in the house".

The week after that, Sandhya was scheduled for a three day conference in Hong Kong and the checking of the school web site was temporarily passed on to Arun. The movement she landed back home, her mother-in-law and husband heaved a big sigh of relief. "Thank God you are back. The School authorities have lost their marbles. You wouldn't have dreamt of the things they have demanded in past three days" complained Arun bitterly. "On Monday night there were instructions to provide Tofu Salad for Tuesday's short recess. The next day they had instructed us to send pictures of ten eminent Indian Scientists. And yesterday night they had asked Sachin to prepare and recite a poem on trees." Sandhya had smiled to herself, as he had mentioned the first two days tasks. Tofu was bean-curd and available readily at the store around the corner, while the Internet

would have helped with the scientist pictures if Arun would have thought of Google or picsearch.com The third task was a bit difficult but Arun could have plagiarized from either Frost, Wordsworth or Byron. There was no need to make such a hue and cry about these assignments. What she didn't realize was that her mother-in-law had never heard of tofu and Sachin had never explored the Net beyond what was required for his job. Besides, he had not even the slightest interest in English literature.

Still, she managed to calm the two agitated souls and told them that she was there now and everything would be taken care of by tomorrow.

But even Sandhya lost her cool the day she came home late (she had just concluded a meeting with the Executive Director, Asia-Pacific and had managed to get home by 10:00 p.m.) and checked the website, only to read "Please provide black grapes for short recess and methi bhaaji and chappatis for long recess". Who decided these menus? Grapes were out of season and Sachin hated methi bhaaji. What was she to do? Deciding to ignore the instructions the next day, she went ahead and gave him apples for short recess and peas bhaaji with chappatis for long recess. At lunch time, she got a call from the school "Mrs. Desai. Your son appears to have brought the wrong items in his lunch-box for today. Didn't you check the notice on the website?" Sandhya explained that it had not been possible to adhere to the instructions due to various reasons. "Mrs.Desai, we strive to achieve a uniform environment in school. If every child brings a different lunch, it will defeat that purpose. Please see that it does not happen again". Sandhya fumed but was helpless as the person at the other end had already cut the call.

At home finally, she mentioned to Arun what had happened that day. He sniffed and said "I had warned you but you were so bent upon enrolling him there. Now do as they say". Sandhya sighed and switched on the Internet connection to check for the instructions for the next day. "Please make sure that your child/ward completes the General Knowledge section on Pg. 20 from the English workbook. The topic is nursery rhymes".

A few moments later, she was racking her brains to come up with the answers to "Who gave the dog a bone?", "Who blew the horn?", "Who pulled out a plum?" and "Who rode on a pony?". The problem was that the nursery rhymes, on which these questions were based, were not printed in the English workbook provided by the school. And it had been years since she had attended nursery herself. Besides, how could Sachin be aware of these nursery rhymes if they were not even in the syllabus? He was just 4 years old. Luckily, she remembered that her cousin's daughter had just started teaching in a nursery. Giving her a panicky call ensured that she got the proper answers. Sandhya grumbled to herself "Do all parents remember their nursery rhymes? And do all parents check the website as scrupulously as I do? And do they all have relatives working in nursery schools to help them out?"

She got her answers the next day. It was a Saturday, a holiday for her as she had alternate Saturdays off. While dropping off Sachin at school in the car (on Saturdays, there was no school bus service), she noticed a woman waving at her. After giving him a good-bye kiss and waving to him as he entered the school, she turned and hesitantly smiled at the woman.

"Hello! Mrs.Desai, isn't it? I'm Mrs. Chheda. My Roshni is in the same class as your Sachin." Sandhya realized that she had seen her before. The woman who was carrying the Prada handbag. Today, she appeared dressed in a Sabyasachi dress and a Gucci clutch. It was just 7:30 a.m. and she was already wearing make-up with Ray-Bans perched on her head, even though the sun was barely up. Sandhya smiled. "Yes. Sachin often talks about Roshni. She just got a new X-Box 360 for her birth-day, isn't it?" Mrs. Chedda replied "Oh! You know, we were just going to give her a Cartier brooch but she insisted on having the X-Box too. My sister's son has one and after seeing it, she had been hankering for

it since the past 2 weeks." Sandhya frowned "But surely she is too young to wear Cartier brooches and play games on the X-Box". "No.No. My daughter is very fashion conscious. She insists on using the very best. Why, just the other day, she was telling me that she would like to buy Manolo Blahnik shoes just like her favorite actress in the latest film" Mrs.Chedda answered.

Sandhya then remembered last night's assignment. "Tell me, Mrs. Chedda. Were you able to solve all the questions from last night's nursery rhyme assignment?". "Dearie, I never trouble my head over Roshni's homework. We have kept a tuition teacher, who comes every day for 3 hours and helps her with her studies. To tell you the truth, I am not even aware of what is taught in class. But I must go now, am late for gym". She rushed away, leaving behind a speechless Sandhya.

Sunday brought guests and she temporarily forgot Sachin's school problems. The day passed quickly and then it was Monday morning. She jumped up and hurriedly switched on the Net to google for information on robots. Quickly downloading the required information, she prepared his project and rushed to iron his purple outfit. After all, Arun and she had office too. Somehow, she persuaded Arun to drop Sachin off to school, while she frantically dressed for office. She had got a message on her cell today- "Due to a strike, there will be no school buses today. Please arrange to convey your child/ward to school. We apologize for the conveyance problem"

After office, she was hurrying home and bumped into Mrs. Khanna in the lobby. "How are you?" said Sandhya. Mrs.Khanna replied "Arre! Kya Bataun? Did U read today's notice on the website? Apparently, all children should henceforth come for gym wearing Nike shoes. I just went to the nearby store to get them and realized that a pair costs Rs.3000/-. Now, u know, I have 3 daughters in the same school. Just imagine what it is going to cost." Sandhya gasped and then grew thoughtful.

Entering her home, she looked around. Sachin was immersed in the Cartoon Network. Luckily, he had not started making atrocious demands for X-Boxes or holidays in Geneva. Yet! Sandhya thought about what could happen if Sachin were left to attend Pine Crest for few more years. Would he turn out like Roshni and mould her into another Mrs. Chedda? She was tired of the mad rush to get home to check the school website everyday. Her mother-in-law had started to make jokes like "The Oracle has spoken. Sachin says that his teacher has asked everyone to get veg-au-gratin for lunch tomorrow. It is already on the website. Sandhya beti, please get cheddar cheese from the convenience store around the corner".

She then realized that enough was enough. SHE was going to decide what her son would wear to school everyday. SHE was going to give him whatever SHE wanted in his lunchbox. And he would grow up in a healthy environment, not one ruled by brands and he would learn to do his own simple projects. Besides, he was just a kid. At that age, he should be enjoying himself and NOT attending 3 hours of tuition after school. Tomorrow, she would start searching for a normal school. Sachin would finally be free and so would SHE!!!

---

## Cricket

Cricket is fun,
When India scores runs.
When Sachin hits a six,
The opposition is in a fix.
When Ganguly hits a four,
Everyone wants to know the score.
When Dravid gets out,
Everyone pouts.
When Harbhajan takes a wicket,
Everyone loves cricket.
As Dhoni takes a catch,
India wins the match!!!!!!!

**–Mithil Welkar**


नवस ?
देवा, जावई येणार आहे मटण छान शिजू दे. तुला दूध-साखरेचा नैवेद्य देईन

# अगडबम

## ❖ सुहासिनी कीर्तिकर ❖

जाहिरातींनी आपल्या ज्ञानात (?) किती भर पडते नाही? अन् जाहिराती तरी किती प्रकारच्या! रोज घरात शिरून त्या टी.व्ही.वरून आपल्याला भूल घालत असतात. उन्हाळा आला... चला, पंखे, एसी, फ्रीज, कोल्डड्रिंकच्या जाहिराती, पावसाळा आला...चला, छानछान हरिणींच्या पायातल्या बूटांच्या जाहिरीती, 'हरणछाप' छत्र्यांच्या जाहिराती, व्हिक्स, आयोडेक्स अशा औषधांच्या जाहिराती, हिवाळा आला. चला, गरम कपड्यांच्या, हिटरच्या जाहिराती, पायांना भेगा पडू नयेत म्हणून लावायच्या मलमांच्या जाहिराती, हात मुलायम रहावेत म्हणून कसल्याशा लोशनच्या जाहिराती. शिवाय दाढी गुळगुळीत करणाऱ्या गालांच्या तरुणींच्या जाहिराती, दात चमकदार करायच्या दातपडक्या म्हाताऱ्यांच्या जाहिराती. यातून माणसाने टिकून रहावे म्हणून कसल्या कसल्या इन्श्योरन्स कंपन्यांच्या जाहिराती. टिकूनच का? नुसतेच 'रहावे' म्हणून 'बोसके विश्व'; 'फनी हाऊस', 'चार्महाऊस' अशा नावांनी सजलेल्या बंगल्यांच्या जाहिराती. यापासून दूर दूऽऽर पळायचे आहे? मग आहेतच की पर्यटनाच्या जाहिराती! अमक्या तमक्या 'भावोजी'बरोबर, म्हाताऱ्याकोताऱ्यांबरोबर, फक्त 'हिल पोरी' महिलांसोबत जाण्याची सुवर्णसंधी! फक्त 'एक कोटी' रुपयांत! सध्या जो तो 'कोटीच्या कोटी' उड्डाणेच घेतोय म्हणा. तो आपला 'बिग बॉस' सलमान नाही का;' इतरांचे अन् स्वत:चे सदरे काढण्यासाठी एका एपिसोडला फक्त एक कोटी वीस लाख घेतोय्. 'कौन बनेगा' म्हणत प्रेक्षकांना रमवणारा फक्त एक कोटी एका एपिसोडच्या प्रश्न विचारण्याला घेतोय्. 'डरना मना'असणारे धाडसी वीर एका एपिसोडचे गेला बाजार फक्त दोन दोन लाख घेताहेत. चिमुरडीपण यापासून दूर नाहीत बरं का.उलट त्यांच्याच जाहिराती जास्त अन् लाइव्ह परफॉर्मन्सही!

थोडक्यात काय; घरातच सगळा जाहिरातींचा 'गोंधळ' चालू. हे पुरेसे नाही म्हणून वर्तमानपत्रांतून या डोकावतातच. अलीकडे नुसत्या डोकावत नाहीत बरं का. वाजताततही. शिवाय पेपर्समधून 'याची, त्याची उचकी' लागावी म्हणून अनेक पत्रके. हिरवी, लाल, निळी, पांढरी रंगीत रंगीत. अलीकडे पूर्वीसारखा प्रात:काळी पेपरचा उपयोग होत नाही म्हणून बरं. नाही तर या छोट्या 'कागदी फडक्यां'चा भलताच की हो वापर झाला असता! भलभलत्या डोकॅलिटीनं या जाहिराती आपल्याला 'जेथे जातो तेथे' सांगाती असतात. मोबाईल म्हणू नका; रेडियो म्हणू नका; शर्टस् म्हणू नका, बॅकलेस बॅक म्हणू नका... सगळीकडे त्या सोबत आहेतच.

हे घरात, मग दारात काय? त्यांचा हल्लाबोल आपला चालूच असतो. आपल्याच मालकीचं घर. पण बाहेर पडलो की दिसतं, अरे! कंपाऊंडवॉलला जाहिरातींनी नवे 'पॅचवर्क' केलेय. आता तर काय? नेत्यांचीही वाण नाही ना? अमका नेता राजकारणात स्थिर झाला की त्याचा तरुण मुलगा, मुलगी लगेच पिढीजात राजकारणात. त्याचा काका, पुतण्या यांना वेगळे सुभे जाहीर.आधी पेट्रोलपंप की मग पुरेसे पेट्रोल भरले की सुरू झालेच 'पेट्रोलिंग.' याला मार, त्याला झोड; याला घेराव घाला, त्याच्या काचा फोड, सेना (फौज या अर्थाने!) उभी कर आणि मग

त्या नावानं सदने उभी कर; याला उभ्याचा आडवा कर, त्याला आडव्याचा तिरडीवर टाक;... असं सगळं शिक्षण चालू होतं. जोडीनंच ही पोरं शिताफीनं एमबीए होतात, पीएचडी होतात, नटनट्यांच्या गोतावळ्यात सिनेमात शिरतात, तितक्याच सहजतेनं राजकारणात शिरतात. पिढीजात धंदा म्हणजे शिक्षणसम्राट बनण्याचा. अशांचे मग 'कट्आऊटस्' कंपाऊंडच्या कोपऱ्याचा आधार घेऊन आपल्या दारांशी उभे. पूर्वी चाळीचाळींच्या कठड्यांवर रंगीबेरंगी कपडे, गोधड्या, वाळत घातलेल्या असायच्या. आता बापड्या चाळी गेल्या. मग 'इव्हेंट'ची धुणी वाळत घालायची कुठे? आहेत ना आपल्या बापाचे रस्ते! रस्तोरस्ती मग बॅनर्सच बॅनर. अमक्याचं अभिनंदन, तमक्याला हार्दिक शुभेच्छा. अमक्या सणासाठी स्वागत, ढमक्या त्योहारासाठी 'इच्छामि', अलाणा गेला... लावा बॅनर, फलाणा आला.. लावा बॅनर! बरं बॅनर असेतसे 'क्षणभंगुर' वगैरे नसतात बरं का. गणपतीत लावलेला बॅनरचा टिळा पाडव्यापर्यंत तसाच. कुणाच्या तरी साठीनिमित्त लटकलेले बॅनर सत्तरी उलटली तरी तसंच रस्त्यावर झुलतेय! त्या बॅनर्सवरचे ते शुभेच्छुकांचे फोटो! 'यांना कुठे पाहिलंत का?' या इयत्तेचे असतात. पण त्यांनाही जाहिरातच करायची असते ना!

बॅनर्सची तोरणं बांधून जाहिराती मुकाट बसतात का? बसावं ना त्यांनी! पण नाही. त्या आपल्या रस्तोरस्ती पळत सुटतात. बसच्या ढुंगणावर, कुशीत खुशीत मिरवत असतात. काय म्हणे तर 'हिरीरी जर्दा खा; तिरीमिरी अनुभवा'. 'मला नकोच' मालिका बघा! 'माझा रिया. माझी छबिका' पहायला विसरू नका. 'कामसुख अनुभवा- वापरा.....' (भर रस्त्यात बसच्या पाठीवर कामसुख अनुभवायचे?'... फारच झाले) बस बिचारी 'बस' म्हणत नाही. घाट्यात गेलीय ना? टॅक्सी, वाहने, रिक्षा, बिचाऱ्या सरकारी घोषणा करीत हिंडतात बापड्या. 'मुलगी शिकली प्रगती झाली!', 'मुलगी म्हणजे लक्ष्मी.' 'एकच पुरे.' वगैरें . हां! 'तेरा मुँह काला' वाचण्यापेक्षा हे बरं बाबा. या जाहिराती वात्रटही असतात. बालीशही असतात. एकदम अधांतरी फुग्यावर बसतात अन् हवेत तरंगतात. सणासुदीला गर्दी खेचायला विदुषक बनून दुकानासमोर विदुषकी चाळे करतात. अहो, नारदाने सुरू केली ना प्रथम जाहिरात. मग अशी नको युक्ती जाहिरातवाल्यांकडे?

एक हिंदी एकांकिका आहे. हं; हिंदीत तिला 'एकांकी' म्हणतात. त्यात टांगेवाला (गेले बिचारे टांगेवाले!) अन् प्रवाशाचे मस्त भांडण रंगते. प्रवासी म्हणतो, 'मैं पाँच आना दूँगा!' (आणे, पैसेही गेले बिचारे) टांगेवाला म्हणतो, 'आपने एक रुपिया बोला था!' दोघेही 'हमतुम' करीत हमरीतुमरीवर येतात. मग काय? भराऽऽरा गर्दी जमते. कुठलीशी गर्दी एकदम मुंग्यांना साखरेचा सुगावा लागावा तशी कुठून येते कळतच नाही. अमिबासारखा सतत आकार बदलणारी ही गर्दी स्त्रीलिंगी ना? मग काय; सतत उत्साहाने भरलेली, बडबड करणारी, लाईव्हली! सगळा न्यायनिवाडा जणू या गर्दीच्याच हातात. इथेही गर्दी जमते. 'काय झालं, काय झालं' कावकाव सुरू. मग प्रवासी महोदय खिशातून एक सोडून दोन रुपये काढतात. टांगेवाल्याला बक्षिस देत आपल्या पिशवीतून वस्तू काढतात अन् सुटतातः सुटतात जाहिरात करायला. गर्दी गोळा करायचा किती अभिनव 'प्रयोग!'

जाहिरातीचे हे जाहीर जाहिरातपुराण इथं लावायचं कारण? नेहमी कारण लागतंच असं नाही. पण आहे; कारण आहे वाचकहो. अहो, काय झालं की गणपतीच्या सीझनमध्ये आमच्या वाडीच्या (म्हंजे गल्लीच्या) तोंडाशी एक मोठ्ठ्याच्या मोठ्ठा उभा फलक होता. अगडबम् बोर्डावर अगडबम बाई, तिच्या शेजारी अगदीच इवल्याशा फटीभर जागेत फटमार फटिचर आपला तो हा! तो म्हंजे तो हो! हां मकरंद अनासपुरे. पाह्यलंत का यांना? नंतर एकदा पुन्हा कधीतरी वर्तमानपत्रात 'अगडबम'ची तृप्ती

भोईर. पन्नास किलोंची. दोनशे पन्नास किलोची दाखविण्याची ही संगणकाची 'किमया'! हात्तीच्या! म्हंजे प्रत्यक्षात 'अगडबम्' तृप्ती एवढीशी, सडसडीत, शेलाटी वगैरे.

जाहिरातीची ही ट्रिक? छे, छे, सिनेमाचं तेच कथानक की हो! असला पिक्चर पहायला (आजच्या भाषेत 'पिक्चर मारायला') मी काय थेटरात गेले नाही. हो! ते अगडबम प्रकरण थेटराच्या पडद्यावरच नाही मावलं तर काय घ्या. पण असा मी पिक्चर पहाण्यावर पडदा टाकला तरी माझ्या मनात कोणताही आडपडदा न ठेवता एक वेगळाच सिनेमा सुरू झाला की हो! (मी तशी मुळातच अगडबम्! आता कुणी तसं म्हणत नाहीत ते सोडा की हो! पण खरं ते आपलं सांगायला माझं काय अगडबम् जातंय्?) मी म्हणता म्हणता अगडबम् स्क्वेअर, क्यूब असं काय काय झाले मनातल्या मनात. खूप मोठ्ठीच्या मोठ्ठी अगडबम्, मग आले ह्या अवतारात 'इस्टेशनवर' अर्धी चड्डी अन् टीशर्ट घालूनच. 'एन्टरटेनमेंटके लिये कुछ भी किया जाय' मध्ये तो 'गाँग' वाजवणारा अन् झुरळ उचलावं तसं स्टेजबाहेर कलाकाराला घेऊन जाणारा असतो ना; तशा खात्रीनं मी गर्दीत शिरले. गाडी आली. मी शिरले आत डब्यात. शिरताना ही झुंबड चढणाऱ्यांची. पण आत शिरली एकच. मी: अगडबम्! आतल्या गर्दीला एका बोटाने बाजूला सारत मी फक्त एक हुंकार भरला. बाप रे! भोवतालची अगडबम् गर्दी इतस्तत: अक्षरश: फिरू लागली, भोवंडू लागली. अगदी खरंच सांगते हो! 'किमयाच्या त्या खोट्या रक्तासारखं' नाटक नाही बरं का. 'फू बाई फू' करू लागली. मग काय? बसले एका सीटवर. तर काय? एक सीट म्हंजे अख्खा एक बाकडाच लागला मला. माझ्या अर्धी चड्डी अन् बुलंद टीशर्टला कुणी सरका म्हणायची काय बिशाद! मलाच जागा पुरली नसती म्हणून; नाय् तर मी अख्ख्या बाकड्यावर आडवी झाले असते! शरीर आडव असलं की अस्सं आड येतं बघा:



काय हरकत नाय. गर्दीत जागा तर मिळाली. सगळी तोंडं माझ्या तोंडाकडं टकामका टकामका आपली  बघत होती. साक्षात रावण आला असता तर त्याच्या तोंडांकडं कशी बघतील? कल्पनेनंच मला हसू आलं. सगळ्या शरीरभर ते हसू गदगदलं. लाद्याच्या लाद्या, वळकट्याच्या वळकट्या वळल्या शरीराच्या. वळल्या, विसकटल्या, पुन्हा वळल्या. अख्ख्या डबाभर मग सगळेच लागले आपले हसायला. त्यांना बहुधा तो 'बसका' ब्रेकडान्स वाटत असावा. म्हटलं मजाय्! नुसतं हसायचं. 'बोट लावीन तिथं गुदगुल्या' कशाला पायजेल? माणसं मॅडच. हसतात आपली. ते हसणं बघता बघता माझं आलंच की ठेसन. जशी चढले तशी उतरले. म्हंजे एरवी उतरायचं म्हंजे केवढं दिव्य! कांदेबटाट्याचं पोतं ओतावं तशी बदाबदा बदाबदा माणसं ओतली जातात खाली-परत चढणाऱ्यांनी झिम्मड. पण अगडबम् अशी मी एवढ्या गर्दीत एकटीच आरामात खाली उतरले. एकानं माझ्या दोन पायांमधून सटकायचा प्रयत्न केला. मी अशी सटकावलीय म्हणता त्याला! अधूनमधून तडका म्हणून गाडीत होणाऱ्या बॉम्बस्फोटातही कुणी असा इंगा पाहयला नसंल. बाहेर पडले. सगळे अवतीभोवतीचे 'मकरंद' 'आऽ' वासून पहात होते. रिक्षाला हात केला. तो त्याच्या सवयीनं 'नाहीच' म्हणाला. पण मी मला कोंबलंच रिक्षात. छे! फार फार त्रासदायक. तो सुरू करणार इतक्यात हाय रे कर्मा! रिक्षा कलंडली, उलटीच झाली माझ्या बाजूनं. अगडबम मध्ये रिक्षा कवचासारखी गच्च तिच्याभोवती. पादरा रिक्षावाला बाहेर पडला कसाबसा. बोंबाबोंब करायला लागला. लोक धावले. बाकी लोकांची परोपकाराची खाज अगडबमच. मला कसं बाहेर खेचायचं? मग डोकॅलिटी सुरू झाली एकेकाची. एक म्हणाला, 'फायरब्रिगेड बोलवा' दुसरा म्हणाला, 'रिक्षा उचकटून काढली पायजेल. लोहार, सॉर्डरवाला, कटरवाल्यांना बोलवा' तिसरा म्हणाला, 'रिक्षावाल्याचं का नुकसान?' कटरवाला बोलावला तर त्याला या बाईंचे पाय कापायला सांगा.' मी ऐकून चाट! भुईसपाट होते ती उभी झाले. रिक्षासकट! रोबोसारखी चालायला लागले. चालता चालता घट्ट पोलके खेचून काढावे आस्ते आस्ते तशी रिक्षा पार्टपार्टने ओढून काढली अन् दिली भिरकावून झालं: तर लोकं मॅडच. त्यांनी टाळ्या वाजवल्या. रिक्षावाल्याने सुटकेचा श्वास टाकत रिक्शाचा 'पोंगु' वाजवला.

बरं तर बरं! माझं घर अगदी जवळ होतं. नायतर काय बॉ, काय झालं असतं! बसमध्ये मी त्या अरुंद जिन्यातून चढूच शकले नसते. रिक्षा केली तर काय; 'वाजला की बोऱ्या'. एक पाय पुढे, मग मागचा पुढे असं करत करत निघाले घरी. रस्त्यातला हवालदार तर त्याची टोपी खाली पडेस्तोवर मान वर करून माझ्याकडं बघत होता. मी 'टर्रर' पाह्यलं त्याच्याकडं. तर टरकून त्यानं डावा हात मागे ठेवून उजव्या हातानं मला सलामच ठोकला. मला आलं हसू. रस्त्यातला सिग्नल डोळे मिचकावून हलला. (हलला की हसला?) मोटारी करकचून ब्रेक मारत थांबल्या. मोटारीतले सगळे डोळे माझ्याकडे पहातायत. अधूनमधून एखादा हत्ती दिसतो रस्त्यावर. पण 'अगडबम्' बाई! २५० किलो वागवणारी. चॅनेलवाल्यांना खबरा गेल्या. पण मी कॅमेऱ्यात तरी मावणार कशी?

आरामात रस्ता क्रॉस केला. माझ्या वाडीत शिरले. गिरगावातली गल्ली म्हणजे वाडी हो. पूर्वी माहीत नाही; पण आताचा गिरगाव म्हणजे उंदीरघुशींचा गाव. त्यात आता टॉवर्स होतायत. त्या बिचाऱ्या उंदीरघुशींनी जायचं तरी कोठे? रस्त्यावर आल्या बिचाऱ्या: कधी मेलेल्या. कावळे खाताहेत. गणपती असले तरी त्या कावळ्यांना श्राद्धपक्षाचीच चंगळ. प्रत्यक्ष उंदीर! अख्खाच्या अख्खा. रस्त्यावरच लचके तोडले तरी म्युनिसिपालटीही दयाळू. लगेच दुसरा उंदीर, दुसरी घूस तय्यार! तर सांगायची गोष्ट म्हणजे अशा उंदीर घुशींच्या गावात, माझ्या घराच्या रस्त्यावर मी चालायला लागले. 'अगडबम्' अशी.

चालताना शरीरमानाने मला माझेच पायही दिसत नव्हते हो! पण माझ्याच मस्तीत चालले होते. ‘चालते चालते’ माझा पाय मऊ मऊ कशावर तरी पडला. हाय! मनात प्रचंड भिती दाटून आली. पायाखाली काय? काय असेल? कुणी पायघड्या घातल्या असतील वाडीत; खास माझ्यासाठी? की मी रस्त्यावर नाहीच; ढगातून चालल्येय. पाय मऊ मऊ ढगोबांवर तर पडला नाही ना? मोठ्या मुश्किलीने मी कंबरेवर हात घेतले. थोडीशी पुढे झुकले. तेव्हा कुठे मला माझे पाय दिसले. ‘दे दर्शन पाया!’ झाले एकदाचे दर्शन.

दर्शन आणखीही कशाचे होते! माझ्या पायाखाली चक्क एका धावत्याखेळत्या, बागडत्या दुडदुडत्या घुशीला मुक्ती मिळाली होती. काय चमत्कार! इतरांना टरकावणारी मी; मीच टरकले. भयानक मोठ्ठ्याने किंचाळले, ‘ईऽऽऽऽऽऽ!’

किंचाळल्याबरोबर खरोखरच एक चमत्कार झाला. ‘अगडबम्’ माझ्यातली हवा फुस्स झाली. फुस्सऽऽऽ, फुस्सऽऽऽऽ, करत मी छोटी छोटी होत गेले. नेहमीची. शरीरानं ‘ऑलराऊण्डर’ पण ठेंगणीठुसकी बेताची झाले. इतका वेळ मला अचंब्याने पाहणारी माणसं अचंब्यातच पडली परत. ‘अय्या, सुहास तू?’ माझी झांटिपी मैत्रीण चित्कारली. ‘अहो, या तर आपल्या कीर्तिकरबाई. रस्त्याने जाताना यांच्या पायाखाली मुंगीही न चिरडणाऱ्या. आता असं कसं झालं?’ ‘बाई नीट जपून चाला. अलीकडे नवीन पद्धत आहे रस्त्यांची. ‘खड्ड्यांचे रस्ते’ बनताहेत.’

हुश्शः हे ‘अगडबम्’ प्रकरण जसं अचानक सुरू झालं; तसं अचानक संपल्याची या उद्‌गारांनी जाणीव करून दिली.

बघा, बघा, जाहिराती काय काय करू शकतात ते!

हां! आता हा लेख कश्शा कश्शाचीही जाहिरात नाही बरं का!

❑



किस्से कोर्टातले

# गोष्ट एका लग्नाची

❖ बागेश्री परीख ❖

तरुण वयात घटस्फोट घेतल्यास पुनर्विवाहाचे चान्सेस बऱ्यापैकी असतात. सध्या तर सामाजिक बदलामुळे अशा विवाहाकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टीकोन पण बदललेला दिसतो. पुनर्विवाहांना, पूर्वीसारखा स्टीगमा राहिलेला नाही. पुनर्विवाह करणं हे गैर मानलं जात नाही. उलट घरातील नातेवाईक, मित्रमंडळी अशा लग्नांना प्रोत्साहन देतात. लग्न जमवून देतात. समाजातील हा बदल खरोखरच स्वागतार्ह आहे.

पुनर्विवाह तरुणांपुरताच मर्यादित नसून मध्यमवयीन स्त्रीपुरुष किंवा अगदी साठी ओलांडलेले स्त्रीपुरुष पण आपला सहचारी शोधीत असतात. त्यामध्ये गैर काहीच नाही. आयुष्याची संध्याकाळ कुणाच्या तरी सोबतीने घालवावी असं वाटणं सहाजिकच आहे.

परंतु अशा प्रौढ विवाहात तडजोड करायची खूप तयारी लागते. कारण ह्या वयामध्ये आपण परिपक्व झालेले असतो. आपली मुले, आपले विचार, आपल्या सवयी, आवडी निवडी ह्या अगदी सेट झालेल्या असतात. आपण ह्या त्या बदलणं किंवा दुसऱ्या व्यक्तिला आनंदी किंवा खूष ठेवण्यासाठी स्वतःच्या स्वभावाला मुरड घालणं खूप कठीण असतं. अर्थातच हे सगळं तुमच्या व्यक्तिमत्त्वावर अवलंबून असते. प्रौढविवाहपण यशस्वी होतात. पण आपल्याकडे ह्याच्या यशस्वीतेची टक्केवारी उपलब्ध नाही. परदेशात मात्र हे प्रमाण ५० ते ६० टक्के असू शकेल.

माझ्याकडे ज्या मध्यमवयीन किंवा वरिष्ठ नागरिकांच्या केसेस आलेल्या आहेत त्या ठराविक साच्याच्या नसायच्या. प्रत्येक केसमध्ये वेगळेपण दिसायचा. म्हणजे तरुणाईतल्या किंवा मध्यमवयीन केसेसमध्ये क्रूरता, विवाहबाह्यवर्तन काही गोष्टी लपवून ठेवून केलेले, कुटुंबीयांचा इंटरफियरन्स, बरे न होणारे शारिरीक व मानसिक विकार, स्वभावदोष, अशी अनेक कारणे दिसायची. बरीच कारणे सारखीच असायची. वरिष्ठ नागरिकांच्या केसेसमध्ये स्त्रियांमध्ये रजोनिवृत्तीनंतर मानसिकतेत बदल घडून आलेला दिसायचा. माझ्या नवऱ्याला आता मी आवडत नाही अगदी feeling of rejection मुळे डिप्रेशनमध्ये गेलेल्या स्त्रिया दिसायच्या. तर पुरुष संशयाचे रोगी झालेले दिसायचे. ही माझ्या जेवणात वीषच घालते. तिला माझी संपत्ती हडप करायची आहे. असे विचार त्यांना अगदी कोर्ट केस फाईल करण्यासाठी प्रवृत्त करायचे. बहुतेकदा हे आरोप बिनबुडाचे असायचे. पण न्यायालयाला मात्र ह्या केसेससुद्धा न्यायदानाच्या चौकटीमधून हाताळाव्या लागतात.

प्रौढ विवाहातील लक्षात राहिलेली केस म्हणजे फ्रेनी दमानीयाची केस. फ्रेनी ह्या पारशी बाईने वय वर्षे ५०, विवाह हक्क प्रतिस्थापनेची केस दाखल केली होती. (Restitutution of conjusal Rights) तीचं लग्न स्पेशल मॅरेज ॲक्टच्या तरतुदीनुसार सरोश दमानीया (वय ६० वर्षे) ह्या स्वजातीय म्हणजे पारशी माणसाशी १ ते १।। वर्षामागे झाले होते.

मला माझा नवरा बायको म्हणून सांभाळीत नाही. त्याला समजावून मला माझा विवाहहक्क प्रस्थापित करून द्या अशी तिची कोर्टाकडे मागणी होती.

फ्रेनी लग्नाआधी प्रौढ कुमारीका होती. शिक्षण इंटरपर्यंतच. आईवडिल असेपर्यंत तीचं आयुष्य

त्यांच्याबरोबर पारसी कॉलनीचीच्या चाळीवजा घरात गेलं. लहान भावाबहिणींना मोठं करण्यात स्वत:चं तरुणपण ती केव्हाच हरवून बसली होती. त्यांची लग्ने झाली पण फ्रेनी मात्र अविवाहित राहिली. त्यांचे संसार पाहताना आपलं घर असावं. आपल्यावर प्रेम करणारं आपलं हक्कांचं माणूस असावं; असे विचार तिच्या मनात घोळत असत. पण तसं कुणी समोर दिसत नव्हतं.

५ ते ६ छोट्या मुलांच्या ट्युशन करून ती ३ ते ४ हजार कमावयाची व स्वत:चा चरितार्थ चालवायची. जेणेकरून भाऊ भावजयीवर भार नको.

फ्रेनी दिसायला, सुंदर किंवा स्मार्ट नसली तरी गोरा रंग व पारशी लुक होते. ती कुणाच्या प्रेमात पडेल अशीही शक्यता नव्हती.

भाऊ, भावजयीला फ्रेनीमध्ये खरच रस नव्हता. ते त्यांच्या आयुष्यात मशगुल होते. पण तिची एक मावशी होती. तिनेच फ्रेनीला सरोशच स्थळं सुचवलं.

सरोश दमानीया, युनियन बँकेतून रिटायर्ड झालेला बँक ऑफिसर होता. एका वर्षांपूर्वी त्याची पत्नी सिलूचं अचानक निधन झालेलं होतं. सरोश हा अपत्यहीन पारशी विधुर होता. सिलूच्या दु:खातून बाहेर येण्यासाठी त्याला त्याच्या नातेवाईकांनी दुसऱ्या लग्नाचा सल्ला दिला.

सरोश तसा बऱ्यपैकी पैसेवाला होता. सिलुसुद्धा बँकेत नोकरी करीत होती. तिने तिच्या वडिलाकडून वन रुम किचन एक घरअंधेरीला हायर केलेले होतं व ती मात्र सरोशबरोबर वांद्र्याच्या पारशी पंचायतच्या ब्लॉकमध्ये राहात होती. सिलूच्या निधनानंतर तिची अंधेरीची जागा सरोशच्या नावावर झाली होती व ती बंदच पडून होती.

सरोशकडे बरी माया जमा झालेली होती. उर्वरीत आयुष्य काहीही न करता आरामात घालवावं अशी त्याची इच्छा होती. कुणीतरी सांभाळ करायला मिळालं तर त्याला चालणार होतं.

सरोशने जेव्हा फ्रेनीला पाहिले तेव्हा तिच्यात नाकारण्यासारखं काहीच नव्हतं. फ्रेनी तर भावाचा संसार करून कंटाळली होती. तिला मानसिक, आर्थिक व शारिरीक सुख आणि स्थैर्य हवंच होते.



सरोश फ्रेनीपेक्षा थोडा बुटका होता. थोडं लंगडत चालायचा. पण फ्रेनीला हे नगण्य होतं. लग्नासाठी फ्रेनी खूप उत्सुक होती. लग्नानंतर ती सरोशच्या वांद्र्याच्या ब्लॉकमध्ये राहायला जाणार होती.

सरोशला भावंडं होती पण आईवडील नव्हते. लग्नाआधी फ्रेनी सरोशला दोन ते तीन वेळा भेटली. तो तिला भेटायला यायचा पण फारसा बोलायचा नाही. अबोल आहे. लग्नानंतर त्याला बोलावच लागेल असं समजून फ्रेनीने दुर्लक्ष केले.

पारशी असूनही सरोशचं दुसरं लग्न म्हणून त्याने कोर्ट मॅरेज केलं. खूप उत्साहाने आणि आतुरतेने फ्रेनी त्याच्या वांद्रयाच्या घरी गेली. घरातल्या नोकरांनी तीचं जंगी स्वागत केले. फ्रेनी मनोमन सुखावली. रात्र जवळ येण्याची तिने खूप उत्कंठेतेने वाट पाहिली.

सरोश खोलीत आला. थोडावेळ बसला आणि काहीच न बोलता हॉलमध्ये जाऊन झोपला. फ्रेनीला त्याची वागणूक अनाकलनीय होती. अशा अनेक रात्री गेल्या. सकाळी व्यवस्थितपणे वागणारा सरोश रात्री असा का वागतो हे फ्रेनीला कोडच होतें.

फ्रेनीनी जवळ येण्याचा प्रयत्न केल्यास तो तिला झिडकारायचा. फ्रेनीला हे अपेक्षित नव्हतं. तिला फक्त आर्थिक स्थैर्य नको होतं तर तिला शारिरीक सुख पण हवं होतं आणि ते मिळविणं हा तिचा हक्क होता.

तिच्या सहानशक्तीचा अंत झाला तेव्हा ती सरोशशी खूप भांडली. तेव्हा कुठे सरोशनी तोंड उघडलं, तो म्हणाला, 'हुं शु करू? हुं तारी पासे आऊ तो मने बेडपर मारी सील्लू देखाय छे. हु अेने कोई दाडोपण भुली शकतो नथी.' फ्रेनीनी कपाळाला हात लावला. मावशीला सांगितलं, भावाला सांगितलं, प्रत्येकाने `It is your personal problem' म्हणून फ्रेनीकडे दुर्लक्ष केले.

फ्रेनीनी त्याच घरात असे चार महिने काढले. सरोशला समाजविण्याचे, चुचकारण्याचे अनेक प्रयत्न केले. फॅमिली डॉक्टरकडे पण नेले. पण सरोशचं एकच म्हणणं 'मने मारी सीलली देखाय छे.'

कंटाळलेल्या फ्रेनीनी अखेर वकिली सल्ला घेतला व त्याच घरात राहून Restitution of conjusal Rights ची केस तिने वकिलाच्या सल्ल्यांनी केली.

६० वर्षाचा सरोश सुरुवातीला एकटाच कोर्टात आला. कौन्सरलकडे त्यांच्या वारंवार मिटिंग होऊ लागल्या.

सरोश व फ्रेनीची हिस्ट्री ऐकून मला उगाचच सरोशची कीव यायची. त्याचे डोळे असे खोल कुणालातरी शोधत असल्यासारखे वाटायचे. पण एरव्ही चारचौघांसारखा नॉर्मल दिसायचा. फ्रेनीचा त्रागा व frustration मात्र तिच्या वागण्याबोलण्यावरून स्पष्ट व्हायचं.

समुपदेशकांकडे सरोशनी स्वत:चा हेल्पनेस कथन केला. त्याला कळत होतं पण वळत नव्हतं. फ्रेनीवर आपण अन्याय करीत आहोत असं गील्ट तो बोलून दाखवीत होता. पण उपाय त्याच्या हाताबाहेरचा


***JOGESHWARI RESORT***

**SANITORIUM**

Under ISHWARI & VIDYADHAR CHARITABLE TRUST No. 14, Divya Hilltop Cottages, Nangargaon, LONAVALA.

**Fully furnished Double Bedroom Hall & Kitchen Units Equipped with Gas, Stove, Utensils and Refrigerators available on daily charge basis.**

Special concessions available on request for Womens' and Children's Institutions, Aged, Disabled or for other justifiable reasons and medical certificates. Booking made on phone as below. Also available, at the Mumbai address, Wheel Chair, Walkers, Crutches, against refundable deposits only.

*Trustees* : PRAMILA & MADHUKAR TALPADE
102, `PRIYA' Raviraj Oberoi Complex,
SAB T. V. Lane, New Link Road,
Andheri(W), Mumbai-400 053.
Tel. : 2630 3902 / 2630 3906
Mobile : 9821447675

Booking Mobile : 09823884094 / 09422543614

आहे असं सरोश म्हणायचा.

अखेरचा उपाय म्हणून सरोशला psychiatrist कडे पाठवलं. फ्रेनीमध्ये खूप संयम होता. ती सर्वतोपरी सहाय्य करायची. psychiatrist नी psychotherapy पण ट्राय केली, पण सरोशमध्ये सुधारणा झालीच नाही. तो सिल्लूला विसरू शकत नव्हता. कालांतराने तो कधीतरी सिल्लूला विसरेल व फ्रेनीला आपलं म्हणेल असं डॉक्टरांना वाटत होतं पण कुणीच खात्री देऊ शकत नव्हतं.

वर्षभर वाट पाहिल्यानंतर आता फ्रेनीची सहनशक्ती संपली होती. तिला ह्या बेगड्या एकत्र सहवासाचा कंटाळा आला होता. भावाच्या संसारामध्ये परत लुडबुड करायला जाण्याची तिची इच्छापण नव्हती. सरोश तिला मेंटनन्स द्यायला तयार होता पण तिला डोक्यावर छप्पर हवं होतं.

प्रश्न कसा सोडवावा असा सर्व जण विचार करीत असतानाच एक दिवस सरोश कोर्टात आला आणि म्हणाला, 'मी फ्रेनीबरोबर एकाच घरात राहू शकत नाही, पण मला तिला रस्त्यावर सोडून द्यायची नाही. मी तिला सिल्लूचं घर द्यायला तयार आहे.' फ्रेनीला पुढे काहीच पर्याय नव्हता. तिला पुढचा प्रवास एकटीनेच करायचा होता. Restitution of conjusal Rights ची मुभा मिळूनसुद्धा सरोशला तिच्याबरोबर राहण्याची व संबंध ठेवण्याची जबरदस्ती कोर्ट करू शकत नव्हतं.

ह्या डीलमध्ये फ्रेनीला निदान तिच्या डोक्यावर छप्पर मिळत होतं. आर्थिक स्थैर्य मिळत होते.

वकिलांच्या सहकार्याने, दोघांनी संमतीने घटस्फोट घेण्याच्या अटी नक्की केल्या व अखेर घटस्फोट घेतला.

ही केस उतारवयात येणाऱ्या केसेसच प्रतिनिधित्व करीत नाही. मी फक्त एक समस्या वाचकांपुढं मांडली आहे. उतारवयात साहचर्य इच्छिणाऱ्यांसाठी ह्या केसचा विचार करून dishearen होऊ नये हा एक वाटचालीतील अपघात म्हणून ह्या केसकडे पाहावे.

❑



# अनुभवाअमृत

## ❖ लता त्रिलोकेकर ❖

ईजाबीजातीजा या उक्तीप्रमाणे सिंगापूर, मस्कत व सान् होजे (कॅलिफोर्निया, अमेरिका) इथे राहाण्याचं भाग्य मला लाभलं. दहा दहा वर्षे राहिल्याने तेथे मी, नुसती रुळूनच गेले नाहीतर रमूनही गेले होते! प्रत्येकवेळी परततांना मी 'होम सिक' व्हायची! माझ्या ह्रदयाचा ठोका चुकायचा!

प्रत्येक ठिकाणी स्वच्छता दृष्ट लागण्यासारखी असायची. सिंगापूरमध्ये साधं बसमधून उतरतांना बसचं तिकीट रस्त्यावर न टाकता खिशात वा पर्समध्ये ठेवायची कायमची सवयच लागून गेली. तिन्हीकडे सार्वजनिक ठिकाणीसुद्धा स्वच्छता असे. सिंगापूरला गेलो तेव्हा प्रामुख्याने ब्रिटीश शेजारीपाजारी होते. कामाला मलेशियाच्या किंवा चिनी बायका असत. शाळेमध्ये इंग्रजी सोडून दुसरी भाषा म्हणून तामीळ न घेता चिनी भाषेपेक्षा सोपी मर्ले भाषा (कारण मर्लेला स्वत:ची लिपी नाही) मुलींना देण्याचा सल्ला, शिक्षण विभागातील तामीळ अधिकाऱ्याने दिला! त्यामुळे मलासुद्धा मर्ले भाषा शिकता आली! परंतु चिनी भाषा मुलं शिकली असती तर आजच्या दृष्टीने ते फायदेशीर ठरलं असतं! पण ती भाषा व लिपी दोन्ही कठीण असल्याने शाळेच्या शेवटच्या वर्षी अंतिम गुण फारच कमी पडले असते म्हणून त्या अधिकाऱ्याने त्या विचारापासून आम्हाला परावृत्त केलं.

घरं ब्रिटीश पद्धतीची, बैठीच होती. सरकार स्वच्छ व कडक होतं. त्यामुळे छोटंसं बेटवजा राष्ट्र असूनही बलशाली होतं. कायदे सर्वत्र पाळले जात होते. ब्रिटीश गेल्यावरही ते स्वतंत्रच राहिले. मलेशिया किंवा चीनला ते तिबेटसारखं गिळंकृत करता आलं नाही. तिनी, मर्ले व तामीळ लोक त्याच क्रमाने होते.मुंबईत सध्या दिवाळीचे फटाके घराघरातून वाजविले जातात. त्यामुळे आवाजाचा धूमधडाका सतत चालू राहतो. चिनी नूतन वर्षाला तसेच होत असे. म्हणून सिंगापूरमध्ये सरकारवतीने फटाके जाहीर केलेल्या दिवशी एका विशिष्ट ठिकाणी लावले जाऊन समस्त जनता ते पाहाण्याचा आनंद लुटते. पण तिन्ही त्रिकाळ लोकांनी फटाके लावणंच बेकायदा आहे. मुंबईत तर रात्री केव्हाही मोटरचे हॉर्न वाजत असतात. आवाज प्रदूषण दिवसा तर काय 'ऐकायलाच' नको! तसेच दिवाळीचे फटाके प्रदूषणाला आमंत्रण.

विषुववृत्तावर असल्यामुळे सिंगापूरमध्ये दिवसा गरमी पडली तर दुपारी ४ वाजता पावसाला सुरुवात व्हायची! पण सर्वत्र हवा स्वच्छ असायची. तेथला संपूर्ण काळ आनंदात गेला.

मस्कती डाळिंबं खूप लोकांना माहीत असतात. हे मस्कत म्हणजे अरबस्तानातील ओमान या देशाची राजधानी. एमिरेटस्सारखं कट्टर मुसलमानी नव्हतं. फक्त स्थानिक स्त्रियांनाच बुरखा घालावा लागे. झांझिबारहून आलेल्या मुसलमान स्त्रियांना बुरखा घालावा लागत नसे! सर्व स्थानिक मुसलमान सोडून इतर सर्व स्त्रिया मोटर चालवू शकत असत. मोटर चालविण्याचे नियम जसे कडक होते तसेच त्याचं पालनही कसोशीनं व्हायचं. मराठी लोकांचा सार्वजनिक उत्सव मांडव घालून व्हायचा. त्यात नाटकंही होत.

इतर भाषेमधील वाङ्मय छापण्याचा हक्क नसल्यामुळे 'मस्कतरंग' हे मराठी हस्तलिखित

त्रैमासिक आम्ही काढत असू. रामदास पाध्येना बोलावून जसा सिंगापूरमध्ये 'बोलक्या बाहुल्यां'चा कार्यक्रम झाला तसाच सार्वजनिक कार्यक्रम मस्कतमध्येही झाला. पु. ल. देशपांडेचाही कार्यक्रम झाला. त्या भेटीत ते मला म्हणाले, ''तुझ्या वडिलांच्या घरी मी 'भरलेले सरंगे' जेवलो.'' मोठ्या प्रयत्नांनी मस्कतमधील जहाजावरून सरंगे मिळवून 'भरलेले सरंगे' मी त्यांना खायला घातले. त्याचप्रमाणे व. पु. काळे, मतकरी व अजित वाडेकरही मस्कतला घरी येऊन जेवून गेले.

रात्री अपरात्री एकटीला मोटर चालवायला मस्कतमध्ये कधीच भीती वाटली नाही. कारण पोलीस बंदोबस्त कडक असे.

ओमानचा बादशहा, सुलतान कबूस इंग्लंडमध्ये शिकलेला होता. आपल्या राज्यात त्याने कायदेशीर सुव्यवस्था ठेवली होती. कबूस धर्माविरुद्ध गेला नाही. पण शेजारच्या राज्यांप्रमाणे कट्टर धर्मवेडाही नव्हता. 'रक्तदान' मुसलमान करीत नसले तरी इस्पितळाला रक्ताची गरज भासल्याने आम्ही रक्तदानाची एक मोहीम अगदी मोठ्या प्रमाणात यशस्वी करू शकलो.

सान् होजेमध्ये आपल्या मुलांचे वयस्क पालक अनेक असतात. परंतु मुलांसमवेत राहिल्याने त्यांना मुलांवर अवलंबून असल्याची जाणीव असते. तसेच अनेक वयस्कर पालक वाहन चालवू शकत नसल्याने शारीरिकदृष्ट्या पण ते पुढील पिढीवर अवलंबून असतात. त्यामुळे अमेरिकेत राहण्याचा त्यांना कंटाळा येतो. भारतात घरगडी बायका सर्व कामांसाठी मिळतात, त्यामुळे त्यांचे डोळे भारताकडे लागलेले असतात. मग या सर्व वयस्क पालकांसाठी चालू असलेल्या भारतीय केंद्राच्या कार्यक्रमात भाग घेऊन ते आपला वेळ चांगला घालवतात. येथील सर्व घरं म्हणजे बैठे बंगले. आमच्या फक्त दोघांच्या स्वतंत्र घरावर आम्ही 'वानप्रस्थ' अशी पाटी लावली होती. स्वतंत्र घर व आमची वेगळी मोटर चालवत असल्याने आमची सान् होजेमधील वर्षे अतिशय आनंदात गेली. नातवंडांच्या समवेत वेळ घालविल्याने आनंदाला सोन्याची झालर लागली! शनिवारी, रविवारी आमच्यासारख्याच (वयाच्या) इतर पालकांना घरी बोलावून आमचा वेळही मजेत गेला. त्यामुळे भारतीय केंद्रावर जायचा प्रसंग आमच्यावर गुदरलाच नाही!

मुंबईत घरगडी किंवा पहारेकरी, मालकाचा कुत्रा फिरण्यासाठी रस्त्यावर आणतात. कुत्र्याची विष्ठा फूटपाथवर पडलेली असते. अमेरिकेत फिरायला नेताना कुत्र्यासोबत प्लास्टिक पिशवी घेऊन जाऊन, त्यात विष्ठा गोळा करून त्याची घरी कचऱ्याबरोबर विल्हेवाट लावण्याचा कायदा आहे! त्यामुळे रस्ते-त्यावरून सहसा कुणी पादचारी चालत नसले तरी- स्वच्छ राहतात.

अमेरिकेत कामगार मन लावून काम करतात. त्यांच्यावर कुणाला लक्ष ठेवावं लागत नाही. मग तो अमेरिकन असो की मेक्सिकन. हायर अँड फायर या तत्त्वामुळे प्रत्येकाला व्यवस्थित काम करावंच लागतं. लाचलुचपत खालच्या किंवा मध्यम स्तरावर बिलकूल नसते. त्यामुळे सर्व कामं झटकन् व्यवस्थित होतात. नियम व शिस्तीचं पालन सर्वत्र होतं. त्यामुळे स्वच्छता सर्वत्र दिसते. मात्र रस्त्याने चालणारे क्वचितच दिसतात! संध्याकाळी फिरतांना स्वेटरमधील कुणी दिसलं की ओळखावं, हे भारतातून आलेले आहेत!! अमेरिकेत मोटर चालवणाऱ्यांना भारतात बेशिस्त रस्त्यावर मोटर चालवायला बिलकूल आवडत नाही.

तिन्ही ठिकाणी पाठारे परभांना भरपूर बाजार मिळायचा! सिंगापूरमध्ये सरंगे बोंबील मिळायचे तर मस्कतमध्ये किंगफिश म्हणजे सुरमय व मोठ्या कोलंब्या मिळत, तसंच शेवंडही मिळे. शिडं व लहान मोटर असलेली डोव्ह धावमधून आम्ही मस्कतमध्ये समुद्रकिनारी फिरतांना लहान लहान बेटांवरील टेकड्यांजवळ खडकातून जिवंत कालवं

(पान ४१ वर)

# We Are But Closet Indians

## Mona Vijaykar

Joel Stein's tongue-in-cheek article in Time Magazine ``My Own Private India,'' July 5, 2010, has had Indians everywhere crying ``Foul!'' A community page on Face-book protest the ``lack of knowledge and ignorance towards Indians.'' A ratio talks show invites listeners to call in with reactions. Every now and then some hustler makes a quick buck abusing sacred Hindu symbols on slippers or toilet seats and our sentiments are rattled. For a while we make resentful noises and then, just as quickly everyone settles into a happy slumber of decision until the next big jolt.

We make this particular episode laughable is not the content of Stein article but the uproarious reaction to it. We Indians are great whiners and woeful protesters, easily touched to the quick but senseless provocation. Yet we remain consistently apathetic to the daily prejudice about Indian culture that is being perpetuated through misinformation, deliberate or accidental, in American public and private educational institutions. As director of Indian in classrooms, a teacher assistance program designed for 6th grade history and social studies, I have visited over 200 Bay Area classrooms since 2003 in an effort to dispel stereotypes and misrepresentation about the Indian civilization.

What I have observed is alarming, to say the least. Generations of students in middle schools have been given skewed understanding of Hinduism, and India's global role in shaping modern civilization has been acutely understated. Teachers emphasize negative stereotypes and Indian guest speakers reinforce the confusion. Middle school children in California get their first glimpse of Indian culture through a prescribed reader, The Homeless Bird, which describes the throwing of cow dung (!) at one another during Holi and how a young girl survives the ordeal of child marriage. An editorial in India Currents rightly warns that children carry inherent prejudices but adults must bear the responsibility to nurture cultural sensitivity among children. Prejudice about the Indian culture prevails in schools with the blessings of Indian parents.

The Indian community in the United States boast of growing political clout, public representation, wealth, and respect. Yet, American society is none the wiser when it comes to substantial knowledge about India. Let's face it--we lack the confidence to humor provocation or the dignity to correct wrong perceptions. We resort to legal battles, which just establish a cycle of hostility and alienate us from those whom we seek to connect with. Why take umbrage at their ignorance when we do little to patiently illuminate them?

Americans are ignorant about the Indian culture because we are ashamed to bring it out of the closet. We hesitate to correct the pronunciation of our names because we think they are ``different.'' If Americans can pronounce Schwarzenegger they can pronounce anything, as long as we politely insist. We are embarrassed to have non-Indian friends and colleagues witness our traditional ceremonies, the significance of which most of us do not care to understand. Rather than demonstrate our freedom to take the best of both worlds, we abandon these rich, meaningful rituals to adopt bland American customs for the ``comfort'' of our ignorant American friends. We are uneasy in casual Indian clothing and regard it as strange

costumes to be worn strictly at community events. Thus, we surrender the liberty to wear the garb of our choice.

Sadly, our inhibition reinforces itself in our children, who struggle to blend in. What they might discover, too late, is that it is our own disrespect for the Indian culture that draws well-deserved humiliation; that assimilation does not mean ``to become similar'' culture clones but to recognize, appreciate, and integrate our similarities, for we are only as different as we allow ourselves to be and prejudice toward Indian culture will remain as long as we allow false notions to flourish.

Granted, Americans in general are severely myopic in their vision of the world. I would best describe their ability to integrate new cultures as arrested development, for most Americans have been unable to expand their cultural bandwidth beyond the last wave of European immigrants. You might argue that your American friends think Bollywood is cool, that henna is in fashion, and that your neighbors are into yoga and tandoori chicken. But let us not confuse cultural appreciation with cultural integration.

Cultural Integration is to step into unfamiliar shoes; to exercise diversity in one's regular life. As Indians we are conditioned to experience and embrace a variety of cultures, but it is inconceivable for most Americans to venture beyond their exclusive cultural zone. You could be neighbors for 20 years sharing happy backyard barbecues and Christmas celebrations, but invite your American neighbors for a puja and they will politely decline for fear of sacrilege!

Assimilation is a two-way process where both immigrants and natives take the best from one another. America can take pride in freedom and liberty only when Americans loosen up, shed their blinders, and be happily inclusive of different lifestyles.

To be fair, American tastebuds must be credited for their remarkable cultural outreach. If culture could be embraced through the stomach, Americans would devour classical Indian Music, dance and art. They would gorge on saris and salwars, even stuff themselves with mouthfuls of Sanskrit. Unfortunately, cultural awareness is not that alimentary; it requires certain guts to stomach change. Both natives and immigrants need the guts to support the unsteady bridge of intercultural exchange.

Like Sandip Roy (Joel Stein and the Curry problem, page 136), many Indians are native to believe that political strength will change perception about the Indian culture. I was deeply struck by an observant remark from one local American authority that while Indians volunteer in hordes and have power ``They are not leaders, they are workers,'' for they never seem to rock the boat. Only when influential Indians no longer feel complled to compromise their Indian identity and have the courage to correct deep misperceptions will they truly empower the Indian community to firmly established its roots in the garden of American multiculturalism

*(Mona Vijaykar, mother of two global citizens is committed to intercultural understanding as founder-director of India in Classroom teacher assistance program. www.indiainclassrooms.org)*

❑

---

(पान ३९ वरून)

मिळायची. ती तशीच खायची! पौर्णिमेला रात्री कोल्हे किनाऱ्यावर येऊन मासे पकडून खातांना दिसत!

सान् होजे इथे चीनहून आलेले सरंगे व कधीकधी ताजे बोंबील चिनी दुकानात मिळायचे. मग आम्ही ती बातमी वाऱ्यासारखी सर्व परभात पसरवून देत असू! अमेरिकेत मादी चिंबोरी मिळाली तर ती ताबडतोब पाण्यात सोडावी लागते. त्यामुळे चिंबोऱ्यांची संख्या सतत वाढत राहते.

अशा तऱ्हेने देशोदेशी आनंदात राहण्याचं भाग्य वडिलांच्या आशीर्वादाने मला लाभलं. तशीच भारतातील वर्षही भारताची प्रगती होतांना पाहात जावोत, हीच इच्छा.

# कवितांचे पान

## नांदेल रामराज्य

घरातील घड्याळात सकाळचे वाजले सात
आज अजून कसा पेपरवाल्याने
पेपर अडकवला नाही दारात।
जर, आज पेपर आलाच नाहीतर
जगभराच्या बातम्या कशा कळणार?
अहो, कशाला करता चिंता
चटकन टीव्ही करा ऑन
पाहा आणि ऐका बातम्या
लक्ष देऊन कान।
टीव्हीवरच्या बातम्या म्हणजे
मिडियाचा मीठ, मीरची, मसाला
पसरवून अफवा भुलविती जनतेला।
नाहीतरी असतं काय बातम्यात
चावून चिक्कट झालेल्या त्याच बातम्या
रोज छापतात वर्तमानपत्रात।
उपासमारीमुळे अन् अनुतीर्ण झालेल्या
विद्यार्थी, विद्यार्थिनीने केलेले आत्ममहत्येचे प्रकार।
कुठे बॉम्बहल्ला, तर कुठे गोळीबार
अल्पवयीन मुलींवर अन् स्त्रियांवर
भरदिवसा नित्य होतो बलात्कार।
लहान मुला, मुलींचे करून अपहरण
बनू पाहती क्षणात सधन
घराघरात नाही एकमत, एकजूट
घुसखोर घुसून करतात देशाची लूट।
म्हणायाला राज्य जनतेचे
पण महागाईच्या भस्मासुराच्या पायदळी
विचारी जनता चिरडली जाते।
गब्बर होतात तिच्या जीवावर
आमदार, मंत्री आणि नेते।
जो, तो पंतप्रधानाच्या खुर्चीवर
बसण्यासाठी धडपडतो
येऱ्या गबाळ्याचे काम नव्हे
हे, न तो जाणतो।
जया अंगी मोठेपण, तया यातना कठीण
टांगती तलवार, सदा असे शिरावर।
कशाला हवेत पक्ष
व्यक्ती तितक्या प्रकृती
देती याची साक्ष।
विसरून मतभेदा हेवेदावे
एकजुटीने हाका राज्याचा शकट
तरच पुन्हा इथे नांदेल रामराज्य।

**-यशोदिनी यदुवीर राणे**

## सूनबाई

दिस चार झाले आज
घरी रेशन आले ।।धृ।।
तांदूळ, गव्हाच्या पिशव्या
उभ्या भिंतीला टेकून
वेळ नसे सूनेला
न पाहिले ढुंकून ।।१।।
म्हणे नाही त्याचा उपयोग
मी नव्या युगाची सून
पैसा आमचा परमेश्वर
कचेरीत काम मन लावून।।२।।
घरासाठीच कमावते
प्रेम मिळावे, तुम्हाकडून
तरी शिव्या सूनेला
जेवण मागवा फोनवरून ।।३।।

**-अजित प्रमोद तळपदे**

## सरस्वती वरदान

सप्तऋषींच्या संगातून
इंद्रधनुष्याच्या रंगातून

वक्तृत्वाच्या रानामध्ये
कवितांच्या पानावरती

सात सुरांच्या तालावरती
एका सुंदरीच्या स्वप्नामध्ये
रोपटे आले लहान

त्याला सरस्वतीचे वरदान
त्याला शारदेचे वरदान

**-मिलिंद सुहास प्रधान**

❀

## तालीबान

आपल्या भावी आयुष्याचे
उभारताच मनोरे
स्वप्न व सत्यातले कळले अंतर।
तुझ्या पालकांच्या
विरोधाच्या विमानांनी
जेव्हा त्याचे केले
वर्ल्ड ट्रेड सेंटर

**-अजित प्रमोद तळपदे**

❀

## चित्र

नऊ ते पाच बाबू-बेबी ऑफिसात खर्डेघाशी
संध्याकाळी थकून घरी दोघं येतात कशीबशी
आल्यावर बाबू रिलॅक्स- दुखल्या म्हणतो तंगड्या
स्वैपाकघरात बेबीचा डिस्को आणि भांगडा

**-डॉ. सुमन नवलकर**

❀

## अमर प्रेम

प्रेम हा शब्द आहे अडीच अक्षराचा
स्वस्त झाला आहे फार, वापर त्याचा।
युवा, युवती याचा करिता सर्रास उच्चार
पाहता क्षणीच म्हणती, माझे प्रेम आहे तुझ्यावर।
पण हे नसतं खरं प्रेम
ते असतं नकली, ते असतं दिखाऊ
सौंदर्याला भाळून, दौलतीला भुलून,
केलेलं असतं तकलादू।
प्रेम असावं आरशासारखं
ज्यात पाहता दोघांच प्रतिबिंब
त्या प्रतिबिंबाला ठेऊन साक्ष
घ्या, आणाभाका, शपथ।
शब्दच केवळ, नका राहू द्यात
त्यांना आणा कृतीत।
प्रेम असावं काचेसारखं पारदर्शक
जे भेदून जाईल अंतरंग
प्रेम असावं स्वच्छ, धुतल्या तांदळासारखं
प्रेम असावं निर्मळ पाण्यासारखं।
पण या प्रेमावर पडली कुणाची वक्र नजर
तर, निर्मळ पाणी होईल गढूळ
धुतल्या तांदळात वळवळतील आळ्या
अन् दिसतील काळे खडे।
पारदर्शक काचेला जाईल तडा
जो कधी न साधता यावा।
आरशाचे उडेल भिंग
अन् होईल प्रेमभंग।
यासाठी विचार करा सारासार
हाणून पाडा जन प्रवादाला करा प्रतिकार।
राहा आपुल्या प्रेमाशी एकनिष्ठ
करा अंत:करणापासून प्रेम
जे असेल तुमचे अमर प्रेम

**-यशोदिनी राणे**

❀

**कथाकाव्य**

# असोशी

देवापुढे दिवा लावून काकीबाय उठल्या
नेहमीप्रमाणे गुडघ्यांनी कुरकूर केली.
काकीबायनी नाकावरची आरशी वर लोटली
भिंतीचा आधार घेत त्या उभ्या राहिल्या
डोकं थोडं जड झालं, डोळ्यांपुढे अंधारी आली
अंमळशाने, सावकाश वळत त्या देवघराबाहेर आल्या.

ओसरीवर मोठा फेऱ्या घालत होता
स्वत:च्या विचारात, पाठीवर हात, मान खाली,
बोटांची गुंतागुंत, उकल करीत....
आपल्याच तंद्रीत फिरून फिरून मग तो बांधावर टेकला
दोन्ही पाय दुमडून हाताच्या घडीत अडकवले
डोकं गुडघ्यावर दाबून तो तसाच बसून राहिला

चुलखोलीत स्टोव्हवर भाताचं आधण खदखदत होतं
कट्ट्यावर हात रोवून काकीबायनी स्टोव्ह कमी केला
फडक्याने टोप उचलून पेज काढली आणि टोप पुन्हा चुलीवर चढवला
चुलखोलीची खिडकी अजून उघडीच होती
आधाराने हळू चालत त्या खिडकीपर्यंत पोहचल्या
बाहेर संध्याकाळ पुरती उतरली होती
घराकडे परतणाऱ्यांची तुरळक वर्दळ होती
रस्त्यावरचे दिवे अजून लागायचे होते
त्या अंधुक संधिप्रकाशात, वळणाच्या अलीकडे
रस्त्याच्या कडेला दोन आकृत्या उभ्या दिसल्या.
सायकल धरून, पॅडलवर पाय ठेऊन तो उभा होता
ती अलीकडे, हँडलवर रेलून, त्याच्याशी बोलत होती
ही... ती.. त्या दिवशीचीच दिसतेय....
काकीबायनी नाकावरची आरशी पुन्हा वर लोटली
डोळे बारीक करीत अंदाज घेतला
दोन वेण्या, फुग्यांच्या हाताचा झंपर, चापूनचोपून पदर घेतलेला
हातात वह्या पुस्तके....
मान वेळावून बोलण्याची तीच लकब....
आणि तो.... तो धाकटाच आहे

हे असं बरेच दिवस बघतेय, एकदा त्याला विचारायला हवं
काय सांगेल तो? लपवेल? की खरं ते सांगेल रोखठोक
भीती तर हीच आहे समजा त्याने आपली ही जिद्दही पुरी केली?
काकीबायनी बाहेर पाहिलं...
खिडकीपुढचं परसू, भिंत, रस्ता..... त्यापलिकडे झाडं, झाडाखाली ती दोघं!
मजेत असे, हसत खेळत बोलण्यात रंगलेली!

काकीबायच्या कानात सनईचे सूर उमटू लागले
चौघड्याने ठेका धरला, घरभर लगबग दिसू लागली.
दारी नवप्रसवा केळीचे खांब, त्यावर गेंदेदार तोरण झुलू लागले.
अंगणात मांडव घातला होता.
दिवाणखान्यात लाल पर्शियन रुजामा त्यावर गुबगुबीत कोच मांडले होते
हंड्याझुंबरं लखलखत होती
माडीवर बायामाणसांची उठबस होती
कसबी साड्यांचे लफ्फेदार पदर सावरत, दागदागिन्यांनी मढलेल्या स्त्रिया
माडीवरून येजा करीत होत्या. सासुबाईच्या देखरेखीखाली मानपान
देणीघेणी, रित-रिवाज सारं काही यथासांग होणार होतं
गच्चीवर पुरुष मंडळींची बैठक रंगली होती.
मागच्या परसात स्वयंपाकाची घाई चालली होती
मोठमोठ्या शेगड्यांवर मोठमोठी टोपं चढली होती
खास लग्नाच्या सुग्रास भोजनाचा सुवास दरवळला होता.
गोडाधोडाच्या पदार्थासाठी स्वत: आत्याबाई भटजींना सूचना करीत होत्या.
मुलानातवंडाची, आप्तस्वकीयांची सोय पाहण्यात काकीबाय पुरत्या गुरफल्या होत्या
मुलांचे वडील, गडीमाणसांकडून कामे करवून घेत होते,
तेथे नेहमीप्रमाणेच उंचावलेला स्वर, काळवेळेचं, प्रसंगाचं जरा भान नाही,
विचार झटकत काकीबाय नवरीजवळ पोहचल्या
हलकेच तिचा शेला नीट करीत, त्यांनी तिच्या खांद्यावर थोपटलं
गौरीहार पुजणारी ही धाकटी नणंद, आपल्या लग्नात परकरी होती
आज आपल्या घरी निघाली होती
मुहूर्त जवळ येऊ लागला... घाटिकापात्र बुडूबुडू झालं
अंतरपाट दूर झाला... आणि वाजंत्र्यांचा एकच कल्लोळ!
तारस्वरात, शुभमंगल सावधानचा गजर. मंत्राक्षतांचा शिडकावा

काकीबाय भानावर आल्या
पुढ्यातली खिडकी वाऱ्याने आपटली होती, आणि गंजलेल्या बिजागऱ्यांनी तिची
साथ सोडली होती. मोठ्या मुश्किलीने, दोन्ही पाखं एकत्र ओढून काकीबायनी

खिडकी बंद केली... फुटक्या तावदानातून परसातले खुरटे गवत, दूर कोपऱ्यात
एक जुना वृक्ष आणि त्याच्या सावलीत, वाढ खुंटलेली, खुरटी झाडं तेवढी दिसत राहिली....

अचानक काही आठवल्यासारखा, एका झटक्यात मोठा उठला
खुंटाळ्यावर चाव्या धुंडाळून तडक गच्चीच्या जिन्याकडे वळला
चुलखोलीच्या दारातून काकीबाय त्याला पाहातच राहिल्या
आता यावेळी हा कुठे निघाला? हं गच्चीवर सुफेण्या वाळत घातल्या होत्या.
त्याची आठवण आता झाली याला. नशीब आतातरी आणल्या, नाहीतर
खाल्ल्या असत्या रत्तलभर! हं!

काकीबायनी लुगड्याचे खोचलेले ओचे मोकळे केले
जमिनीवर हात दाबत त्या खाली बसल्या....
ह्याचं हे असं, कुठलीच गोष्ट वेळेवर नाही
बेबीचं बरं लावून दिलं, उशीरा का होईना....
थोड इकडे तिकडे, थोडं पडतं घेतलं पण खात्यापित्या घरात गेली
आवड किती शिक्षणाची, शिकती तर कुठे पोहचती
धाकट्याने तेवढं लावून धरलं म्हणून नोकरी तरी मिळाली
नाहीतर चालवलंय रेटून पूर्वजांच्या पुण्याईवर
जुना काळ सरला- त्याबरोबर जुनीजाणती माणसं गेली
नातेसंबंधी हळूहळू क्षीण झाले...
नव्या काळाशी नाळ नाही जुळली, ना घरात ना घराबाहेर!
आपली तर दुनियाच पालटली, बालपणापासून मध्यमवयापर्यंतच
संपन्न, सुखवस्तू , सुरक्षित आयुष्य काळाबरोबर ढासळू लागलं आहे,
जशी ही वास्तू!
वाडवडिलांची ही देणगी सांभाळण्याची असोशी हवी प्रत्येकात!
आजच्या काळाची पावलं ओळखून....
अंगणात गेटचा आवाज आला
हॉलच्या कोपऱ्यात फोनवर मोठा बोलत, बोलतो कसला, ऐकत होता
फोन ठेवत तो पुढच्या दाराकडे धावला
दाराची कडी काढून त्याने दार अर्ध उघडलं.
बाहेर गेटला खिटी लावल्याचा आवाज आला, आणि दमदार पावलं
पायऱ्या चढू लागली
मोठा घाईने माजघरात शिरला, तिथे काकीबायना बघून त्याला हायसं वाटलं
अर्धवट उघड्या दारात, अंधुक दिव्याच्या प्रकाशातही त्याला सावली दिसली
त्या वास्तुचे सर्वेसर्वा मालक घरी परतले होते

**-दीपकळी नवलकर**

## सासूचे मनोगत सुनेच्या शब्दात

आज झाली पंचाहत्तरी
आयुष्याची ही उत्तरी
करावयास साजरी
जमल्या साऱ्या माझ्या घरी

बालपणीच्या पाच मैत्रिणी
भूतकाळाच्या गाठोड्यातल्या
जणू गोड रम्य आठवणी

फणसवाडी, नवीवाडी
राहिले नाही आता काही
तरीही आम्हा खंत नाही

जमतो जिथे आम्ही साऱ्या
छेडल्या जातात जुन्या तारा
तारुण्यातला वसंताचा
पुन्हा फुलतो रम्य पिसारा

अनेक बहर आले गेले
अनेक ऋतु अनुभवून झाले
माई आई करता करता
आजीची मी पंजी झाले

माझ्या सख्या माझ्याच सारख्या
बोलता बोलता आज्या झाल्या
मुले, सुना, नातवंडांच्या
गोतावळ्यात अडकून गेल्या

हा गोतावळा असाच राहो
किंबहुना वाढत जाओ
पाहुनी कुणी करतील हेवा
नाहीतर कुणी देतील दुआ

आम्हा मैत्रिणींच्या आयुष्याचा देवा,
हाच खरा अनमोल ठेवा

**-अलका तळपदे**

(१४ वर्षांपूर्वी माझ्या सासूबाई कै. मोहिनी म. तळपदे ह्यांच्या ७५व्या वाढदिवशी त्यांच्यासाठी लिहिलेली ही कविता)

## दुधावरली साय

दूध असतं फसवं, गृहिणीचं लक्ष
जरा होता इथे तिथे
फसकन् उफाळून येतं वर
अन् चटकन उतू जातं।
जणू पती देवाचा राग अनावर
बिचारी मुकाट्याने सोसते जन्मभर।
आबाल-वृद्धांपासून
दुधावाचून साऱ्यांचेच अडते
पती, कुटुंबप्रमुख असल्यामुळे
साऱ्याचेच नडते!
पण दुधात असतो एक चांगला गुण
दुधावरली मऊ साय, तिची सर कोणास येणार नाय।
त्या सायीपासून घ्यावा बोध
पतीदेवांनी करावा सुखी संसाराचा शोध।
सोडुनी राग, वागा त्यांच्याशी प्रेमाने
जाणून घ्या, त्यांची मने
करा त्यांच्यावर माया
रहा आनंदाने, घेऊन संगे
आपुली मुले अन् जाया।

**-यशोदिनी राणे**

## बदल

मिक्सरच्या दबदब्याने पाट्या-वरवंट्यात पडलं अंतर
टीव्हीच्या दणक्यामुळे रेडिओच्या घशात घरघर
एसीच्या थंडाव्यात पंखा कापू लागला थरथर
लॅपटॉप लाडात मांडीवर बसताच हँग झालं कम्प्यूटर

**-डॉ. सुमन नवलकर**






'कारगील'मधील हुतात्म्यांच्या कुटुंबीयांसाठी राखीव 'फ्लॅट्स'।

# एक श्रद्धांजली

## ❖ अलका मीनल तळपदे ❖

सासूबाईना जाऊन पाच दिवस झाले होते.बिछान्यावर काढलेले शेवटचे सहा महिने सोडले तर नव्वदीच्या उंबरठ्यावर मुलं, नातवंड-पतवंड, लेकी-सूनांच्या बरोबर राहून शांपणे मरण येणं तसं पाहता भाग्याचंच होतं. तरीही मन काही शांत होत नव्हतं. त्यांच्या आठवणी दाटून डोळ्यात रोज पाणी आणीत होत्या. बरेच सांत्वनांचे फोन आले. त्यात माझ्या मैत्रिणींचे जास्त होते, ज्या माझ्यासारख्याच रिटायर होऊन घरात बसल्या होत्या. काही मुंबईत; तर काही मुंबईबाहेर. अगदी परदेशातूनही फोन आले. पण सर्वांचा एकच सूर होता, ''अग, आम्हाला माहीत नाही का तुझे नि त्यांचे संबंध कसे होते?''

रेखा म्हणाली, ''त्यावेळी आमच्यात तू एकटीच अशी होतीस की जी कधीच सासूच्या तक्रारी शाळेत आणीत नव्हतीस. आम्ही सर्वजणी तुझा हेवा करीत होतो.''

चंपा म्हणाली, ''तुझ्या घरी केव्हाही आले की त्यांचे अलकापुराण चालू व्हायचे की आम्ही ऐकून कंटाळून जायचो. पण त्या थकायच्या नाहीत.''

भारतीने बोलता बोलता विचारले, ''तरी किती वर्ष तू राहिलीस त्यांच्याबरोबर?''

मी म्हटले, ''माझं लग्न झाल्यापासून त्यांच्या मृत्यूपर्यंत म्हणजे जवळ जवळ चाळीस वर्षे.''

फोन ठेवल्यावर तिच्या ह्या प्रश्नाने माझ्या डोळ्यासमोर चाळीस वर्षांच्या डायरीची पाने फडफडू लागली.

सासूसुनेचं नातं तसं पुरातन काळापासूनच बदनाम झालेलं, अगदी कारल्यासारखं. मग ते साखरेत घोळलेलं असो किंवा तूपात बोळलेलं असो, लोकांना ते कडूच वाटते. मला आठवते, लग्न होऊन सासरी आले तेव्हा मी नुकतीच ग्रॅज्युएट होऊन नोकरीच्या शोधात होते. त्यावेळी माझ्या सासूबाई एका कॉन्व्हेंटमध्ये शिक्षिका होत्या. हळूहळू एक गोष्ट माझ्या लक्षात आली की आमच्या घरात 'वन वुमन शो' (चांगल्या अर्थाने) होता. नोकरी करूनसुद्धा घरातील सर्व कामे सासूबाईच करीत असत. सणवार, देवधर्म तर सोडाच; पण बाहेरची कामेसुद्धा अगदी सकाळी लवकर उठून मटण आणण्यापासून बँकेपर्यंतची कामे त्याच करीत आणि तेसुद्धा न चिडता, न कंटाळता. दारावर आलेल्या अंडीवाल्याकडून अंडीही त्याच घेणार, इस्त्रीवाल्याला कपडे त्याच देणार आणि त्याचा हिशोब करून पैसेही त्याच देणार. त्या नेहमी म्हणायच्या, ''माझ्या डिक्शनरीत 'कंटाळा' हा शब्द नाही.'' आणि ते खरंच होतं.

एवढं करून नाटक-सिनेमाला जाणे, अधूनमधून हॉटेलात जाणे असा चैनीही त्या तेवढ्याच उत्साहात करीत असत. घराबरोबर स्वत:कडेही त्यांचे लक्ष असे. गरमीच्या मोसमात स्लीवलेस ब्लाऊज घालण्यापासून नखांना नियमित फाईल करून शेपमध्ये ठेवण्यापर्यंतची फॅशनही त्या सांभाळत असत.

वर्षातून एकदा मुंबईबाहेर हवापालट करण्याचा प्रोग्रॅमही त्याच आखत आणि वर्षातून एकदा न चुकता माऊंटमेरी, जोगेश्वरी व सिद्धीविनायकाची त्यांची फेरीही असे. काश्मीर आवडले म्हणून

दुसऱ्यांदा काश्मीर-टूर आणि नेपाळ-टूरही त्या शाळेतल्या मुलांबरोबर करून आल्या.

आज जाणवते; जीवन-गाणे त्या खऱ्या अर्थाने जगत होत्या. त्यांचे एक ब्रीदवाक्य होतं, 'बायकांच्या जातीला कंटाळा शोभत नाही,' त्यांच्या ह्या मताशी मी कधीच सहमत नसे.

काही वेळा बोलूनही दाखवत असे, 'का म्हणून? बायका काय माणूस नाहीत?'

पण त्यांनी त्यांची मतं माझ्यावर कधीच लादली नाहीत. उलट साध्या साध्या गोष्टीत त्यांना माझा सल्ला लागे. लग्नाला जायला साडी कोणती नेसू? कोणता ब्लाऊज बरा दिसेल?हा की तो? अर्थात आज ह्या गोष्टीचे अप्रूप वाटत असले तरी त्यावेळी ह्याच गोष्टी इरीटेट करीत होत्या. आपण त्यावेळी समजून घेऊ शकलो नाही ही खंत आता कायमचीच.

त्यांचा हा सर्व उत्साह ओसरताना मी प्रथम पाहिला तो त्या निवृत्त झाल्या त्यादिवशीच. डोळ्यातलं पाणी हळूच लपवताना फक्त माझ्याच डोळ्यांनी टिपलं होतं. त्यानंतर घरीच ट्यूशनस् घेऊन त्यांनी मन रमवलं आणि स्वत:ला सावरलं.

तोपर्यंत मी त्यांच्या पाऊलावर पाऊल टाकत शाळेत नोकरी मिळवली. त्यांच्या अनुभवी मार्गदर्शनाची  इथेही मला मदत झाली. शाळेचे रिपोर्टस्, प्रेझेन्टेशन, आर्टिकल्स लिहायला त्यांच्या हाय लेवल इंग्रजीची मला मदत मिळाली आणि त्यामुळे माझीही लेवल थोडी वाढली. घरी आलेल्या मैत्रिणींशी सासूबाई जेव्हा फाडफाड् इंग्रजीत गप्पा मारीत बसत तेव्हा माझी कॉलर ताठ होत असे. पण त्यातलीच एखादी कुचकट टोमणाही मारीत असे, ''अलकापेक्षा तिची सासूच फ्लूएंट इंग्लीश बोलते नाही?''

तेव्हा मीही ते हसण्यावारी नेत असे. कारण मला पक्कं माहीत होतं की माझे मराठी मीडियमचे इंग्रजी आणि त्यांचं कॉन्व्हेंट शाळेचे इंग्रजी ह्यात नक्कीच फरक होता.

हळूहळू  वयोमाने मेमरी कमी होत गेली आणि मग त्यांच्या मनाने निवृत्ती स्वीकारली.हे माझ्या लक्षात तेव्हा आले जेव्हा आल्या गेल्याला त्या सांगू लागल्या, ''आय ॲम एन्जॉयिंग रिटायर्ड लाईफ.''

मी शाळेत जात असे. मग माझ्यामध्ये त्या स्वत:चे हरवलेले दिवस पाहू लागल्या. शाळेत जायला निघाले की ठराविक प्रश्न यायचे. ''लवकर चाललीस? आज उशीर झाला ना?'' कधी सांगायच्या, ''आज शाळेत जाताना माझ्या नवीन साडीची घडी मोड हो.'' तर कधी त्यांना माझ्या साडीचा रंग रूप आवडलेला असायचा.

माझ्या शाळेतून घरी यायच्या वेळेला न चुकता दार उघडून वाट बघत असायच्या आणि मग तोच नेहमीचा संवाद....

''आली ग बाय माझी! सकाळी तू कोपऱ्यावर वळेपर्यंत मी बघत होते तुला आणि आता तुला कोपऱ्यावर वळलेली पाहिले आणि मग खिडकीतून उठून दार उघडून तुझी वाट पाहात बसले.''

ही गोष्ट रोज अगदी ह्याच शब्दात नव्याने सांगत असल्याप्रमाणे सांगत असत. कारण काल सांगितलेले त्यांना आज आठवत नसे. मी मात्र कधी हसून, कधी कंटाळून तर कधी त्रागा करून ऐकत होते. मी रिटायर होईपर्यंत तरी हा घेतला वसा त्यांनी टाकला नव्हता.

आज त्या ह्या जगात नाहीत. अर्थात माझी वाट बघणारे किंवा मला 'लवकर ये ग!' सांगणारे कुणी उरलं नाही. कदाचित म्हणूनच ह्या शब्दांचे महत्त्व आज मला समजत आहे.

साठीच्या चष्म्यातून जेव्हा ही चाळीस वर्षांची पाने उलटतांना पाहिली तेव्हा बरंच काही नव्याने उमगले. तरी शेवटी हाती उरलेलं सत्य हेच होतं की 'गेलेली वेळ आणि माणूस परत येत नाही...कधीच नाही.'

●

# Open Letter to Prize Winners

## ❖ Pratap Velkar ❖

My Dear Friends,

Lokamanya Tilak once said in one of his speeches, "He who makes use of his Education for the betterment of the community is truly an Educated Man. The rest are the Beasts of Burden."

The inspirational thought that Lokmanya gave influenced the young minds is those days. And that had created enormous workers in the country.

Hello! Winners, you will be rewarded with a prize this year. Pray, please bear in mind the noble thought of that great patriot. It will certainly inspire you to do the work for the betterment of the society. But do not loose yourself for God's sake, and become the Beast of Burden to your community.

You shall be rewarded and treated to a feast on the day of celebration. Once the ceremony is over, you will be deserted by the community workers as a routine. They are not obliged to guide your future nor arrange to train you for the betterment of the community. Your high standard education will earn your living but weaker section will not, they will gain strength only through verbal help and nothing else.

True, funding organization, the weak community is benefited but I think of no more worthwhile ambition for any individual than to achieve for himself the honorable title. According to Tilak, the winners like you, who make use of their education for the betterment of the weak community i.e. to secure their future give proper guidance and training, which the weaker section needs most.

I wonder how many people seriously consider the full responsibility of every citizen to serve his community. Most people believe that their duty and interest in community ends after they have fulfilled their obligation by donating to the organization.

I again say funding an organization, the weak community is benefited. But I think of no more worthwhile ambition for any individual, than to achieve for himself the honorable title. Unfortunately our carnivals lack luster, in implication of the commodities such as inspiration, encouragement, guidance and training.

Every community needs good community leadership. No community can grow and prosper unless there are individuals within its group who are willing to take time from their private affairs and make sacrifices for the good of all, even to the extent of contributions from their purse. People who are willing to make sacrifices and do these things are knows as community leaders.

We have such educated leaders in our community, who are willing to help, counsel the needy, willing to take time, for the betterment of the weaker section, if properly approached. They are silent and shy, do not want to show off; but if properly approached they are willing to do things for the betterment of the community. Then, why not invite them to our carnivals, appoint them and take the advantage of their assistance!

I would like to introduce some of them. These are well known Astro-Physics Research Scholar Sanjeev Dhurandar, famous Chartered Accountant Gautam Nayak, Master Builders Suresh Kothare and Engicon Vijayakar and Alok Pradhan Editor-in-Chief "In Touch'', Bayer's Vice President.

Luckily biodata of Alok Pradhan is with me right now. Friends, it gives me great pleasure to present you, most amiable person, versatile and useful youth, who has brought our community at international level. Take his guidance.

**ALOK VINOD PRADHAN**
B.Com (Bom) M.B.A. (Calif)
Chief Editor-Magazine
"IN TOUCH''
Vice President-Bayer
Corporate Communications

**Background:**
A highly motivated, result oriented communications professional, with 15+ years of successful experience with the communications departments of diverse industries.

**Current Profile:**
- ❈ Heading the Corporate Communications department for the Bayer Group in India.
- ❈ Responsible for all internal and external communication activities, including India.
- ❈ Reporting to Country Head-Bayer Group of Companies in India.

**Professional Accomplishment:**
- ❈ Was invited to Bayer AG-Germany for working on worldwide project planning for the company.
- ❈ Planned and executed the internal & external communications activities for the restructuring plans of Bayer in India.
- ❈ Initiated the first corporate image campaign for Bayer in India.
- ❈ Prepared an 'Image and Awareness' enhancement plan for Bayer in 14 countries in the Asia Pacific region, when based in Singapore.

**Experience:**

| | | |
|---|---|---|
| **Bayer South East Asia Pte. Ltd., Singapore** | April 2001-December 2002 | 4 |
| Corporate Advertising and | | |
| New Media Manger, Region-Asia Pacific | August 1997-March 2001 | 3 |
| **Bayer (India) Limited, Mumbai** | | |
| General Manager-Corporate Communications | | |
| **Mafatlal Industries Limited, Mumbai** | February 1996-July 1997 | 2 |
| Asst. Manger- Corporate Communications | | |
| **Greaves Limited, Mumbai** | January 1992-January 1997 | 1 |
| Communications Officer | | |
| **Grey Advertising, Mumbai** | April 1991- December 1992 | |
| Accounts Executive | | |

**Education:**
- ❈ M.B.A. in Advertising and Marketing, Newport University, California, U.S.A.
- ❈ Diploma in Advertising and Marketing, Xavier's Institute of Communication, Mumbai
- ❈· Bachelor of Commerce, University of Mumbai, Lala Lajpatrai College of Commerce, Mumbai.
- ❈ ICSE, Delhi Board, Christ Church School, Mumbai.
- ❈ "Performance Through People'' course at Ashridge School of Management, U.K.in September 1999.

**Date of Birth:**
February 17, 1968 (42 years)

# The American way of life

## Ajit Mankar

Recently, Tejasweeni and myself, concluded a 7 night/8 days Celebrity cruise tour of Alaska, on our own, covering parts of Canada and USA on S.S. Infinity starting and ending our voyage at the port city of Seatle in the USA.This was a real 5 star royal cruise experience where every passenger receives the VIP treatment right from the moment of stepping on the footpath by the side of the wharf from your vehicle,to boarding the ship, till you fly off and reach the destination in any other American city on conclusion of your voyage. Meticulous attention is given to every detail for passenger comforts from the start to finish.All arrangements are planned in a systematic and exclusive way by the cruise company so that from the moment of arrival at the wharf for boarding the cruise,your baggage is totally handled by the cruise staff, till the point of air destination on departure at the end of your journey. One is,therefore, set to enjoy the total stay hands-free and hassles-free like a King and Queen.The luggage picked up at the warp is lined up outside your cabin much before you even reach yours Stateroom!

There were 2025 passengers and about 1000 crew members on board the ship.On checking the list of people and their nationalities,we were little disappointed to learn that we were the only 2 Indian passengers on board and 40% crew being of the Indian origin, inclusive of both our room-attendants.No need to say we got extra-special treatment on room and food service.

On the ship, there is not a dull moment,as mostly round the clock entertainment programmes such as housie,live band,live singing concerts,dancing floor,movies,circus acts, dramas and theatre performances (in a theatre of the size of Shivaji Mandir),Jaccuzi, hot and cold water swimming pools, gymnasium,all kinds of food and non-alcoholic beverages, coffee shop & duty-free shopping etc. for which are all available free of cost,except for a few things such as the alcoholic drinks,.sauna,massage,spa,casino etc. for which there is a separate charge.Each Stateroom is serviced by 2 attendants round the clock with room service,and each reserved table in the hall for dinner is also served by 2 separate attendants.On entry in to your Stateroom,there is a welcome bouquet and souvenir neatly placed on the writing table giving full details of today's and tomorrow's programmes on board for your advance information.The Stateroom is really stately in all respects, in the true spirits of the term.

In short,I for one, would not hesitate to recommend each of my readers to enjoy this life- time cruise experience at least once ! Of-course,if you choose to take the Alaska cruise,I should say, sooner the better, before the spectacular Glaciers of Alaska melt completely in a few years owing to climatic changes.So much for the Luxury Cruise Liner.

On completion of the immigration formalities at the wharf,we were issued electronic computerised door key cards of our Stateroom in duplicate,and a card pass for the reservation of our dining table # 108 with a time slot of 8.30 p.m... First night we were feeling quite nervous with the idea of sharing the dining table with total aliens.However,when we joined the table,the other 4 couples were already seated and awaiting us.They were 2 American and 2 Israeli couples.We were the fifth couple to join the table laid for totally ten people.The

Israelis were 2 brothers with their wives by the surname Walla and the whole family was happy to see us Indians. One of the brothers was working in the Israeli defence establishments, on a higher post, on an on-going secret defence project with India. Out of the Americans, Gary and Lynn were a jovial, charming,lively and lovable middle- aged friendly couple.Another senior American pair of Masons were a little reserved by nature and would prefer to talk sparingly.

We got introduced to each other and with the friendly approach of all the people around, our anxiety soon turned in to friendship much before we could even realise it.The name of the wife of one of the Israelis was Golda.So I stood up and saluted her and paid the rich compliments saying we Indians appreciate the courage shown by their ex-Prime Minister Mrs Golda Mayer in bringing all the surrounding Arab States to her knees,with the help of their then defence minister Moshe Dayan, in their struggle of existence during the late sixties.The Israelis promptly reciprocated by praising our own ex Prime Minister Mrs.Indira Gandhi and Field Marshall General Maneckshaw for being instrumental in cutting Pakistan to size.in 1971,and besides assuring me that we are brothers in arms.The Israelis seemed to be better versed of the Indian scenario in general. All this dialogue was well received by the Americans and subsequently we all discussed a lot of politics and policies of Netanyahoo,George Bush,Obama Mrs Hillary Clinton,Bin Laden etc..In short, the 5 course lavish and tasty dinner turned out to be an even more enjoyable event in each others' company that evening..

Later on the same night, during the live singing concert I noticed Lynn cosing on the lap of Gary in a dark corner of the hall sharing the wine in the same glass and both of them having the fullest intimate fun.

The next night at the dinner table,while the order was just placed by all of us and as there was some time for service of food, Lynn gave a quick head, shoulder and back massage to Gary to make him cheerful, as he was feeling a little tired and fagged out, due to kayaking experience he had earlier on.All in all, it was well evident,they were both greatly enjoying each others company during their unique vacation on board.

On the fourth night,all were present in time for dinner except Lynn.I casually asked Gary why his wife has not joined yet.Gary replied in the negative by saying Lynn is not his wife! I corrected myself and said I just meant his partner.Gary again replied in the negative by saying loudly that Lynn is not his partner either!! I was non-plussed and taken aback by then.Still I equated courage and persisted to know who she was, after all. The reply was, she was just his Stateroom-mate sharing the bed and costs as always !!!

With this dialogue our Israeli friends got terribly uneasy and shaken-up,because in Israel their orthodox community does not tolerate relationships out of the wed-lock,and the Jews the world-over have the most conservative ideas of closely knit family ties, like most of us in India. I ,therefore, chose to hastily change the topic to excursions we all had that morning at the port of Ketchican and so on.

After a while as the food was ordered,Lynn joined us at the table.She explained that since morning she was not in good health and suffering from vomiting, nausia and slight giddiness.She did not feel like having dinner but joined the table for the sake of giving company to Gary.

That evening Lynn was freely talking to Tejasweeni.She told us about her background

**म्हणी**

‘माय मरो मावशी जगो’, ‘बायकोपेक्षा मेहुणी बरी’

‘जिच्या हाती पाळण्याची दोरी-ती जगाते उद्धारी’

बायकुड्याच सगळ्या म्हणी, एकतरी मर्दानी म्हण बोला,

‘जो दुसऱ्यावर विसंबला, त्याचा कार्यभाग बुडाला’

**-डॉ. सुमन नवलकर**

that she is in her late 30s and working as a head- Mistress in a reputed Secondary School near Boston,was married and divorced twice,with a kid each from her past 2 marriages, and both her kids were presently in the custody of her respective ex-spouses.As justified by her teaching profession, she curiously enquired about the present day cultural and family set-up in modern India and Israel.Tejasweeni told her that back home we ourselves live and share together the same 3 bed-room / hall / kitchen apartment with our Son,Daughter-in-law and a grand-son and usually this is the standard pattern of living of Indian families, accommodation permitting.

Lynn was quite amazed with the information.It so turned out in her own case that her mother recently divorced her father after a long married life and chose to live with a younger man,resulting into the father having been dumped in the old people's asylum home some few thousand miles away near Colorado and presently leading a lonely, solitary and miserable life almost being forced to the brink of insanity.Because of the distance of travelling involved,she is not in a position to visit him so often as she would like to be. As far as Gary is concerned,he is a successful self employed civil engineer by profession, but till date, has managed to remain a bachelor all along.So it became clear to us that they were not a married couple as we were taking them to be !

Tejasweeni then asked Lynn,in a typically Indian fashion, about the prospects of her marrying Gary, in the near future, in view of their thick and intimate relationship.But Lynn vehemently replied there were no immediate prospects of her marrying Gary,although she confided, heart of hearts she welcomes the idea. The reason for this, as given by her was, that Gary is an ardent lover of pets and keeps 2 big dogs in the house who regularly accompany him in bed,whereas Lynn dislikes the pets altogether and would not appreciate the idea to accommodate the dogs in the house along-with Gary.According to her,Gary on his part, would not give up the company of dogs for the sake of her, nor would she like to adjust herself in any manner whatsoever.

Poor little bigoted children Lynn and Gary ! They both love each others' company, and at the same time, neither of them wish to mend their ways even by an inch to accommodate one another.That's the irony of the situation!

You may say what a pity! But mind well, even Cupid is helpless in resolving these matters for them.

For us, it is better not to think and strain ourselves too much.

After all,this is just the American way of life!

●

Shri Suresh Shivshankar Talpade who expired on 12th October 2010, was the son of Shri Shivshankarji Talpade who was the first Secretary of Prabhu Tarun since its inception. Earlier, Prabhu Tarun Board consisted of Editor, Secretary and President. Shri Vihang Nayak was last Secretary. Since Shri Shivshankarji was Secreatary, Prabhu Tarun was published and delivered on 16th of each month from the residence of Shri Shivshankar Talpade at Thakurdwar.Shri Shivshankar family, that his son in particular, Shri Suresh, used to be involved in tying of knots of monthly issues, pasting address and stamp labels on each copy of monthly issue and timely delivering it to postoffice so that the readers received Prabhu Tarun every month in time. Shri Suresh Talpade's involvement in this work is therfore creditworthy.Their selfless work is really complimentary especially when today it takes days for us to receive and read Prabhu Tarun in time. Well done Shri Sureshji. May the departed soul rest in peace.

# पाठारे प्रभु महिला समाज

दिनांक २३-१०-१० रोजी महिला समाजाचा दांडियाचा कार्यक्रम झाला. नेहमीच्या ठिकाणी. खारच्या पाठारे प्रभु सांस्कृतिक सभागृहात सायं. ६ ते १० अशा वेळात रंगलेल्या या कार्यक्रमात रंगीबेरंगी वस्त्रांची, चुनड्यांची, उपरण्यांची उधळण करीत दांडियांनी ठेका धरला होता. 'तालियोने ताले' गरबा घुमत राहिला. सुरुवातीला महिला समाजाच्या सभासद तरुणींनी, अगदी पंच्याहत्तर अवघे वयमान असलेल्या तरुणींनी(!) गरबा नृत्याच्या विविध रंगाकृती साकार करीत या कार्यक्रमाचा शुभारंभ केला. त्यानंतर रंग, ताल, रिंगणफेरी वाढतच गेली, चढतच गेली. महिला समाजाने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी उत्तम स्त्री कलाकार, पुरुष कलाकारांना वयोगटाप्रमाणे विभागणी करून स्पर्धेतील बक्षिसे दिली. वयोगटाप्रमाणे स्त्रीपुरुषांच्या वेषभूषेला पारितोषिके दिली. तिकीटांवरील क्रमांकांची मान्यवरांच्या हस्ते 'लॉटरी' काढून विजेत्यांनाही भेटवस्तू मिळाल्या. स्पर्धेचे परीक्षक होते- दक्षा शहा, मेहता. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महिला समाजाच्या अध्यक्षा सौ. वृंदा जयकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले होते माधुरी विहंग नायक यांनी. त्यांचे स्वागत करून त्यांना समाजातर्फे भेटवस्तू दिल्या. अध्यक्षपदावरून बोलताना माधुरी नायक यांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या. प्रभुतरुणाच्या प्रत्युषला असाच भरभरून प्रतिसाद देण्याचे आवाहनही त्यांनी याच व्यासपीठावरून केले. सूत्रसंचालन होते नीता सेंजित यांचे.

सहभागी सर्वांनाच म्हणजे कलाकार आणि प्रेक्षक यांना 'कुटुंबसखी'चा भरपेट नाश्ता होता. दिवाळीपूर्व असा हा कोजागीरीचा संमेलनजल्लोष सर्वांनाच तृप्त करून गेला. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे नेटके संयोजन.

## प्रभुतरुणास देणगी

- श्री. मुकुंद अजिंक्य यांच्या स्मरणार्थ श्रीम. उषा मुकुंद अजिंक्य यांजकडून रु. ५०००/-
- सौ. उर्मिला उमेश कोठारे यांच्या सत्तराव्या वाढदिवसाप्रीत्यर्थ रु. २५००/-
- सौ. सुनेत्रा विजय प्रधान स्मरणार्थ विजय ग. प्रधानकडून रु. १०००/-
- श्री. मीनलकुमार मनोहर तळपदे यांजकडून त्यांच्या आई कै. मोहिनी मनोहर तळपदे यांच्या स्मरणार्थ रु. ५०१/-
- मंगला हरिनंदन धैर्यवान आजीव सदस्यत्व रु. ३५०/-
- सौ. ज्योत्स्ना रामकृष्ण तळपदेंकडून त्यांची सून सौ. धनश्री विनेश तळपदे बी.एड्. (एसएनडीटी विद्यापीठ) झाल्याबद्दल रु. २५१/-
- श्रीमती पल्लवी प्रदीप तळपदेंकडून कै. प्रदीप रामराव तळपदे स्मरणार्थ रु. १२५/-

(नि.२२-८-१० मृत्यूनंतर नेत्रदान केले. स्पृहणीय.)

- श्री. सुमन्त रामराव तळपदेंकडून रु. १०१/-

## आत्याबाई नाव बोला

९-१०-१० अरना अभिजित तळपदे

२४-१०-१० तुरवी (श्रावणी) गौतम कोठारे

## मरण

९-१०-१० विंगकमांडर किशोर कन्हैयालाल कीर्तिकर, वय ८५, पुणे

१५-१०-१० श्री. मुकुंद आनंदराव अजिंक्य, वय ८० खार

१३-१०-१० श्री. अतुल राजेंद्र नायक, वय ५२, अंधेरी

२३-९-१० श्री. मधुकर (हनुमान) शांताराम मानकर, वय ८०, अंधेरी

३-११-१० श्रीम. इंदिरा पुरुषोत्तम देसाई वय ९७, अंधेरी

## परीक्षेतील सुयश

**एल.एल.एम. (सेंकड पार्ट)**

टीना दिलीप अजिंक्य ६४ टक्के

**बी.ई. (मेकॅनिकल)**

ऋषिकेश तेज वेलकर, प्रथम श्रेणी

## अभिनंदन

◆ महाराष्ट्र शासन क्रीडा व युवक सेना संचालनालयातर्फे आयोजित आंतरशालेय नेमबाजी स्पर्धेत मुंबई शहर विभाग, दहा मीटर एअर पिस्तुल गटात कु. वैजयंती विश्वास अजिंक्य हिने सुवर्णपदक पटकाविले. अभिनंदन.

◆ स्त्रीआधार केंद्राच्या अध्यक्षा आणि आमदार नीलम गोऱ्हे यांनी पुण्याच्या स्त्रीआधार केंद्रासाठी बृहन्मुंबई आणि नाशिक जिल्ह्यासाठी समन्वयक प्रतिनिधी म्हणून उज्ज्वला गोविंदराव आगासकर यांची नियुक्ती केली. अभिनंदन.

◆ श्री. शाम विनायक जयकर ४-११-१० रोजी ऐंशी वर्षाचे झाले. अभिनंदन.

### चुकीची दुरुस्ती

गतांकी सौ. उर्मिला कोठारे यांचे अभिनंदन करताना नाव कृपया सौ. उर्मिला उमेश कोठारे असे वाचावे. उमेश कोठारे क्षमस्व.

गतांकी श्री. आलोक पी. जयकर यांचा एमबीए (मार्केटिंग)चा 'रिझल्ट' आला आहे. त्यापुढे प्रथम वर्ष, ६७.५ टक्के गुण असे कृपया वाचावे.

### नोंद घ्या

प्रभुतरुण दिवाळी अंक हा जोडअंक असल्याने पुढील अंक १६ जानेवारी २०१० ला प्रकाशित होईल


*// श्री इंद्रायणीप्रसन्न //* *// श्री गुरुदेव दत्त*



# प्रकाश कॅटरर्स

**शुभ मंगल, स्वागत समारंभ.... सहली, सम्मेलन!**

*आम्ही, अशा मंगल प्रसंगी रुचकर जेवणाची व्यवस्था करण्यास सज्ज आहोत. पाठारे प्रभूंच्या वैशिष्ट्यपूर्ण पदार्थांची व्यवस्था, शाकाहारी/मांसाहारी जेवणाचे चवदार गरमागरम खाद्य पदार्थ नियोजित वेळी पोहचविण्याची, वितरण आदी सेवा!*

*विशेषत: सागुपुरी, गोडी बटाटी, अननस सांबारे इ. आणि तसेच पंजाबी डिशेस, गुजराथी डिशेस शिवाय सजावट - रोषणाई फर्निचर आदी व्यवस्था देखील करतो.*

*खारमधील गायत्री मंदिराशेजारील पाठारे प्रभू ज्ञाती सभागृहात एकमेव आम्हालाच मागणी असते.*

**: संपर्क :**

**प्रवीण धुरंधर**

डि. १३, बँक ऑफ इंडिया, वृंदावन सोसायटी, दुसरी कोल डोंगरी लेन, स्वामी नित्यानंद मार्ग, अंधेरी (पू.) मुंबई-४०० ०६९.

फोन : २६८४ ०९ २६ भ्रमणध्वनी : ९९६९१०४३८८



**बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुणाच्या मालकीचे हे पत्र**

स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ शाह अँड नाहर इंड. इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०० ०१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४०० १०२ येथून प्रसिद्ध केले. **कार्यालय दूरध्वनी** : ६७८ ०० ४४

# प्रभु तरुण भाऊबीज

| | |
|---|---|
| सौ. लीना मिलिंद वाझकर | रु. १०००/- |
| कीर्तिकर फॅमिली प्रभादेवी चॅरिटेबल संस्थेकडून | रु. १०००/- |
| सौ. नीता दिपक विजयकर | रु. ५००/- |
| सौ. चंदिनी राजस अजिंक्य | रु. ५००/- |
| सौ. मयुरा गुंजारव नायक | रु. ५००/- |
| श्रीमती माधुरी विहंग नायक | रु. ५००/- |
| श्री. आनंद दत्तकुमार धराधर | रु. ५००/- |
| कु. विहान श्रीनल कोठारे | रु. ५००/- |
| सौ. रीटा मंदार नायक | रु. ५००/- |
| सौ. प्रतिमा विनोद प्रधान | रु. २५०/- |
| सौ. आशा सुधीर धैर्यवान | रु. २००/- |
| सौ. आशा जयबाल विजयकर | रु. १५१/- |
| सौ. शोभा रंजन विजयकर | रु. १५१/- |
| डॉ. सौ. सुमन सुवर्णकुमार नवलकर | रु. १५१/- |
| श्री. सुनील मनोहर जयकर | रु. १५०/- |
| सौ. रोनिका सचिन विजयकर | रु. १०१/- |
| सौ. भारती रसिक विजयकर | रु. १०१/- |
| सौ. सुहास नंदकुमार विजयकर | रु. १०१/- |
| सौ. अनिता अभिजीत विजयकर | रु. १०१/- |
| श्रीमती रीता प्रवीण विजयकर | रु. १०१/- |
| सौ. पूजा मंदार कोठारे | रु. १०१/- |
| सौ. संजना दिपक कोठारे | रु. १०१/- |
| सौ. निशा शरद कोठारे | रु. १०१/- |
| श्रीमती सुहासिनी सुहास कोठारे | रु. १०१/- |
| सौ. श्रुता आनंद तळपदे | रु. १०१/- |
| सौ. ज्योस्त्ना रामकृष्ण तळपदे | रु. १०१/- |
| सौ. धनश्री विनेश तळपदे | रु. १०१/- |
| सौ. वर्षा सदानंद नवलकर | रु. १०१/- |
| श्रीमती किरण चंद्रकांत नवलकर | रु. १०१/- |
| सौ. उर्मिला विजय धैर्यवान | रु. १०१/- |
| सौ. मनीला अनिल राव | रु. १०१/- |
| सौ. निलन दिपक धैर्यवान | रु. १०१/- |
| सौ. उर्मिला उदय जयकर | रु. १०१/- |
| सौ. अस्मिका राजेश नवलकर | रु. १०१/- |
| कु. वैजयंती विश्वास अजिंक्य | रु. १०१/- |
| श्रीमती यशोदिनी यदुनाथ राणे | रु. १०१/- |
| श्रीमती सरोज वसंत सेंजित | रु. १०१/- |
| सौ. स्मिता सुरेंद्र केसवानी | रु. १०१/- |
| सौ. प्रांजली राजेश धुरंधर | रु. १०१/- |

# प्रभु तरुण भाऊबीज

| | | | |
|---|---|---|---|
| श्रीमती कुमुद गजानन राणे | रु. १०१/- | सौ. लुबीना समीत विजयकर | रु. १००/- |
| डॉ. अमिता राहुल नवलकर | रु. १०१/- | सौ. नंदा दिपक नवलकर | रु. १००/- |
| सौ. गीतांजली अमोल रणजीत | रु. १०१/- | श्रीमती सुहासिनी अशोक कीर्तिकर | रु. १००/- |
| श्रीमती आश्विनी रोहन कोठारे | रु. १००/- | श्रीमती चारुदत्त नवीन धैर्यवान | रु. १००/- |
| सौ. जागृती परेश कोठारे | रु. १००/- | श्री. मोहनीश नारायण शेटऱ्ये | रु. १००/- |
| सौ. रश्मी प्रमोद जयकर | रु. १००/- | सौ. मेघना विवेक विजयकर | रु. १००/- |
| सौ. मिनल हेमंत जयकर | रु. १००/- | सौ. सुजाता दिवाकर कोठारे | रु. १००/- |
| सौ. कुंदा प्रताप वेलकर | रु. १००/- | सौ. सुशीला पांडुरंग कोठारे | रु. १००/- |
| सौ. ऐश्वर्या तेज वेलकर | रु. १००/- | सौ. जयश्री सचिन जयकर | रु. १००/- |
| डॉ. सौ. सुरेखा बन्सी धुरंधर | रु. १००/- | श्रीमती शिल्पा रसिक तळपदे | रु. १००/- |
| सौ. अनुराधा विनोद धुरंधर | रु. १००/- | सौ. अनुपमा सुरेश कोठारे | रु. १००/- |
| सौ. निकेता प्रशांत राणे | रु. १००/- | सौ. अर्पणा अनुरेश कोठारे | रु. १००/- |
| सौ. मेघना प्रदीप राणे | रु. १००/- | सौ. जना रवींद्र नवलकर | रु. १००/- |
| सौ. मेनका जयपाल तळपदे | रु. १००/- | सौ. स्मिता अमोल रणजीत | रु. १००/- |
| सौ. प्रमिला मधुकर तळपदे | रु. १००/- | सौ. उषा ज्योतीन्द्र अजिंक्य | रु. १००/- |
| सौ. सुरेखा प्रदीप कोठारे | रु. १००/- | श्रीमती सुरेखा वसंत सेंजित | रु. १००/- |
| सौ. उत्तरा ललित कोठारे | रु. १००/- | श्रीमती शुभ्रा अचल तळपदे | रु. १००/- |
| श्रीमती हेमा केशव कोठारे | रु. १००/- | श्रीमती ललिता सदाशिव जयकर | रु. १००/- |
| सौ. ऐशाना अलोक प्रधान | रु. १००/- | सौ. कौशिक सुभाष जयकर | रु. १००/- |
| सौ. अनुराधा सिमीत देसाई | रु. १००/- | सौ. वृंदा शाम जयकर | रु. १००/- |

Regd. NO. MH/MR/West/169/2010-2011 RNI NO. 14613/67
Prbhutarun/November-December (Diwali) 2010


# RAJAN JAYAKAR COLLECTIONS

**Flat No. 2, Court View, 126, Maharshi Karve Road, Churchgate, Mumbai-400020**
**Tel: 22820570/72, Mob.: 9821072417, Fax.: 22821299**
**E-mail: rajanjayakar@yahoo.com**

I have started work on my forthcoming book Pathare Prabhus of Bombay showcasing history, art, culture and heritage of Pathare Prabhus. I have collected and am still collecting material for including in Book as well as setting up Museum. I am particularly looking for following material:

1. Cerificates issued to volunteers and participants in our three community exhibitions held between 1909 and 1938 and any other related material.
2. Old paintings or prints of Gauri Pat, Vat Savitri Pat, Pithori Pat etc.
3. Paintings or prints of designs of Rangoli drawn by Pathare Prabhus.
4. Tabutufali, Vaghbakri, Bezique markers and other games played Pathare Prabhus in old days.
5. Old wedding and family photos of Pathare Prabhus in prabhi dress.
6. Original Paintings or Prints of Mr. M. V. Dhurandhar and Ms. Gorakshakar.
7. Entire Scrpits of Dramas written by Pathare Prabhus.
8. Any pictorial or written material on M. R. Jayakar, M. V. Dhurandhar or M. B. Velkar.
9. Old or new Photographs of Kul Devtas such as Jogeshwari, Ekveera, Prabhadevi etc.
10. Old property ownership documents showing Pathare Prabhus as owner of the property in Bombay.
11. Pre-1947 currency notes, coins, Tram Tickets, Railway Tickets of BB & CI and GIP railways, counterfoils of Old drama or cinema tickets.
12. Old Pathare Prabhu, Masik, Prabhu Prabhat and Prabhu Tarun in yearly bundle only and not stray issues.
13. Old Prabhu dress such as jama, pagdi, red border dhoti, dagla, kasbi sari, ladies jackets, shela, shalu etc. in reasonably good condition.
14. Old Khel for decoration of Ganapati aaras in glass. porcelain, miniatures, silver etc.
15. Typical Prabhu ornaments and jewellary in gold, pearls and precious stones.
16. Kitchenware such as shevara, bhati, exclusive crockery etc.
17. Old advertisement or letter heads of Pathare Prabhus establishement and business.
18. Brass or copper Bamb, Baldi, Ghanghal, soap box etc.
19. Rao Bahadur, Rao Saheb or any other bravery medals received by Pathare Prabhus.
20. Books and magazines pertaining to history of Pathare Prabhus and also Old Bombay.
21. Any other typical Pathare Prabhu artifact used in olden times.

**-Rajan Jayakar**